
# LOK MAHAVIDYALAYA, WARDHA

# DEPARTMENT OF LIBRARY SCIENCE

# M.Lib. Sem - III

## Paper - V

## Industrial Information System



# भारतातील उद्योगधंद्याची वाढ आणि विकास व औद्योगिक ग्रंथालये

(Growth and Development of Industries and Industrial Libraries in India)

उपघटक- १.१ भारतातील औद्योगिक वाढ (Industrial growth of India)

१.२ उद्योगाचे प्रकार - शासकीय आणि खाजगी (Types of Industries – Grovernment and Non- government )

१.३ ग्रंथालयाचे कार्य आणि औद्योगिक माहिती केंद्रे (Role of Libraries and Industrial Information Centres)

१.४ औद्योगिक ग्रंथालयाचे प्रकार (Types of Industrial Libraries)

## १.१ भारतातील उद्योगधंद्याची वाढ व विकास

### १.१.१ भारतातील उद्योगधंद्यांची वाढ व विकास

प्रत्येक देशाचे यश त्या देशातील उद्योगधंद्यांच्या वाढीवर व विकासावर अवलंबून असते. हीच देशाच्या यशाची गुरुकिल्ली असून देशाचा सर्वांगीण विचार यावरच आधारलेला असतो. भारतही या नियमाला अपवाद नाही. भारत हा कृषिप्रधान देश असला तरी देशाचे राष्ट्रीय उत्पन्न, लोकांच्या जीवनमानाचा दर्जा, स्वयंचलित अर्थव्यवस्था आणि विकासासाठी कृषी क्षेत्राच्या विकासाबरोबरच उद्योगधंद्यांचा विकास होणे आवश्यक आहे. यासाठी भारतात कृषी विकासाबरोबरच त्याच्याशी निगडित इतर उद्योगधंद्यांची वाढ व विकास होणे आवश्यक आहे. भारतात उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी व विकासासाठी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक प्रयत्न करण्यात आले. यासाठी औद्योगिकनीतीचा अवलंब करण्यात आला.

उद्योग क्षेत्रात सर्वंकष औद्योगिकीकरण म्हणजे आर्थिक विकास असे समीकरण मानले जाते. अनेक लहान-मोठ्या वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेल्या कारखान्यांचा समावेश औद्योगिक क्षेत्रात करण्यात येतो, कारखानदारीत वाढ होणे म्हणजेच औद्योगिकीकरण असा साधा अर्थ आहे, असे आपण म्हणू शकतो. मर्यादित शेतजमीन व शेतीच्या उत्पादनतंत्रात झपाट्याने होणारे बदल या अनुषंगाने तेथील रोजगारात घट होणार पण वाढती लोकसंख्या आणि समाजाच्या बदलत्या गरजांची पूर्तता करण्यासाठी कारखानदारी व उत्पादनात वाढ करणे गरजेचे आहे. यामुळे साहजिकच अधिक रोजगार, उपभोग्य वस्तूंचे वैविध्य व सातत्यपूर्ण आर्थिक विकास यासाठी औद्योगिकीकरणात वाढ होणे आवश्यक आहे. रोजगारनिर्मिती उत्पादन, उत्पादन विविधता, साचेबंदपणा, दर्जेदार उत्पादन, उत्पन्न पातळीत वाढ. सरकारी कर व इतर उत्पादनात वाढ, परदेशी मालाशी स्पर्धा, परकीय चलन, संतुलित विकास या सर्व गोष्टी औद्योगिकीकरणावर अवलंबून असल्यामुळेच औद्योगिकीकरण देशाच्या आर्थिक विकासाची गुरुकिल्ली ठरते.

**औद्योगिकीकरणाची उत्पत्ती**

आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक देशांचा अभ्यास केला असता, विकसित राष्ट्रांच्या आर्थिक विकासामध्ये औद्योगिकीकरणाची मोलाची भूमिका असलेली दिसून येते. यात व्यापार, वाणिज्य आणि उद्योग या तिन्ही क्षेत्रांचा समावेश झालेला आढळतो. विसाव्या शतकामध्ये जगातील अविकसित आणि विकसनशील देशांनी आपला आर्थिक विकास साधण्यासाठी औद्योगिकीकरणाला प्राधान्य दिलेले दिसून येते. कोणत्याही देशाला आर्थिक प्रगती साधायची असेल तर औद्योगिकरणाची गती वाढविणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात देखील औद्योगिकीकरणावर भर देण्यात आला. औद्योगिकीकरणासाठी भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी पंचवार्षिक योजनेत यासंबंधी अनेक तरतूदी केल्या. ही परंपरा कायम ठेवत अकराव्या पंचवार्षिक योजनेपर्यंत अशा तरतूदी करून आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. भारताबरोबरच चीन व जपान या देशांनी सुद्धा लघु उद्योगांपासून मोठ्या उद्योगांपर्यंत औद्योगिकीकरणात प्रगती करून आर्थिक विकास साध्य केला.

**औद्योगिकीकरणाचा अर्थ आणि व्याख्या -**

औद्योगिकीकरण किंवा उद्योगीकरण या संकल्पनेची व्याप्ती विचारात घेता तिची काटेकोर व अचूक व्याख्या करणे अशक्य आहे. 'वस्तूंची निर्मिती करणाऱ्या उद्योगांमध्ये वाढ होणे म्हणजेच औद्योगिकीकरण' असा मर्यादित अर्थ आपण लक्षात घेऊ शकतो. उद्योगांची वाढ होत असताना वैज्ञानिक पद्धतीने उत्पादन , श्रमविभागणी, विशेषीकरण यांच्यासह यंत्र, रसायने, ऊर्जाशक्ती या साधनांच्या सहाय्याने उत्पादन करणे तसेच उद्योगाच्या संघटनात बदल घडवून आणणे अशा प्रक्रियांचा समावेश औद्योगिकीकरणात करण्यात येतो. थोडक्यात, वस्तू उत्पादनात प्रति नगामागे येणारा खर्च कमी करणे असे मर्यादित उद्दिष्ट्य औद्योगिकीकरणात असते. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत संबंधित देशातील उपलब्ध कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याची क्षमता देशांमध्ये वर्तमान करण्याच्या दृष्टिकोनातून वाढविण्यात येते. अर्थशास्त्रामध्ये औद्योगिकीकरण या संकल्पनेचा अर्थ मर्यादित स्वरूपात विचारात न घेता अधिक व्यापक अर्थाने विचारात घेतला जातो. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत वस्तुनिर्मिती करणाऱ्या उद्योगाची स्थापना व विकासाबरोबरच अर्थव्यवस्थेच्या रचनेत आणि समाजरचनेत परिवर्तन घडवून आणणे अपेक्षित असते.

औद्योगिकीकरणाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी काही विचारवंतांच्या व्याख्या खाली दिलेल्या आहेत.

**फ्रान्सिस चेरुनिलम -** औद्योगिकीकरणाच्या उपलब्ध व्याख्यांपैकी फ्रान्सिस चेरुनिलम यांनी दिलेली व्याख्या अधिक संयुक्तिक वाटते. यांच्या मते, औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आर्थिक विकासाची गती वाढते. त्याचबरोबर अर्थव्यवस्थेमध्ये संरचनात्मक बदल घडून येतो. हा बदल साधनांचा उपयोग, उत्पादनकार्य, उत्पादननिर्मिती, उत्पन्ननिर्मिती, व्यावसायिक रचना, लोकसंख्या विभाजन आणि विदेशी व्यापार इत्यादी घटकांच्या बाबतीत घडून येतो आणि सामाजिक परिवर्तनाला उत्तेजन मिळते.

वरील व्याख्येनुसार औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये उत्पन्नात वाढ होते. अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल होतात. यातून विशिष्ट सामाजिक परिवर्तनाला उत्तेजन मिळते, असे स्पष्ट होते.

**युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक्स अँण्ड सोशल कौन्सिल -**

१९६३ मध्ये युनायटेड नेशन्स इकॉनॉमिक्स अँण्ड सोशल कौन्सिलच्या रशियन शिष्टमंडळाने औद्योगिकीकरणाविषयी त्यांना अभिप्रेत असलेली संकल्पना पुढीलप्रमाणे विशद केली आहे. -

'औद्योगिकीकरण ही आर्थिक विकासाची अशी पद्धत आहे ज्यात संपूर्ण अर्थव्यवस्थेचा वृद्धीचा दर अधिक ठेवण्याच्या दृष्टीने देशातील संसाधनांचा बहुतेक भाग, अद्ययावत तंत्रज्ञान आणि उद्योगातील विविधता विकसित करण्यात येते आणि आर्थिक-सामाजिक मागासलेपणावर मात केली जाते.'

औद्योगिकीकरणामुळे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होते. उद्योगधंद्यांची संख्या वाढते. उत्पादनात वाढ होऊन राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते. याचाच अर्थ आर्थिक विकासाचा वेग वाढतो. यामुळेच अविकसित राष्ट्रांच्या आर्थिक विकासामध्ये औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

औद्योगिक क्षेत्रात भांडवल धनीकरण आणि विस्तारण या दोन घटकांचा समावेश होतो. या संकल्पनांचा अर्थ ए. एच. हॅन्सन यांच्या 'फिस्कल पॉलिसी अँण्ड बिझनेस सायकल' या पुस्तकात पुढीलप्रमाणे दिला आहे. -

'भांडवल धनीकरण म्हणजे वस्तू उत्पादनाच्या प्रति नगामागे अधिक प्रमाणात भांडवलाचा वापर करणे होय.' तसेच 'भांडवल विस्तारण म्हणजे वस्तू उत्पादन आणि भांडवल उभारणीच्या प्रमाणात एकसमयाच्छेद करून वाढ करणे होय.'

औद्योगिकीकरणामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. शहरीकरणाचे प्रमाण वाढते. विदेशी व्यापारामध्ये परंपरागत वस्तूचे प्राबल्य कमी होऊन औद्योगिक वस्तूच्या प्रमाणात वाढ होते. सेवा क्षेत्राचा विकास आणि विस्तार होऊन याचा फायदा सामाजिक परिवर्तन घडण्यास होतो. आर्थिक व सामाजिक परिवर्तनातून राजकीय क्षेत्रात सुद्धा परिवर्तनास उत्तेजन मिळते.

**भारतातील उद्योगधंद्याची वाढ व विकास**

**उद्योगधंद्याची वाढ**

(१) परिणामात्मक बदल
(२) संख्येत वाढ

**उद्योगधंद्याचा विकास**

(३) पायाभूत घटक
(४) आर्थिक संसाधने
(५) उपलब्ध भूखंड
(६) भौगोलिक परिस्थिती
(७) मानव संसाधन
(८) उपयोजक
(९) उपयोजकांच्या गरजा
(१०) इतर आवश्यक बाबी

औद्योगिकरणामुळे प्रक्रियेतून होणाऱ्या औद्योगिक क्रांतीमुळे एखाद्या राष्ट्रांमध्ये सामाजिक आणि राजकीय क्रांती घडून येते.

**औद्योगिकीकरणाचे स्वरूप -**

औद्योगिकीकरणाच्या स्वरूपाचा विचार करताना विविध देशात कशा प्रकारे औद्योगिकीकरण घडून आले ? याची माहिती घेणे आवश्यक असते. काही निकषाच्या आधारावर आणि औद्योगिकीकरणाच्या व्याख्येच्या विवेचनावरून स्वरूप निश्चित करता येईल. एखाद्या अर्थव्यवस्थेत औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत कोणी पुढाकार घेतला ? या निकषावरून औद्योगिकरणाचे तीन प्रकारांत वर्गीकरण करता येईल -

(१) व्यक्तिगत किंवा खाजगी पुढाकाराने घडून आणलेले औद्योगिकीकरण.

(२) सरकारच्या पुढाकाराने घडून आलेले औद्योगिकीकरण.

(३) सरकार व खाजगी भांडवलदारांच्या संयुक्त पुढाकाराने घडवून आणलेले औद्योगिकीकरण.

औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत सुरुवातीस कमी-अधिक प्रमाणात सरकार आणि खाजगी भांडवलदार या दोन्ही घटकांचा सहभाग असलेला दिसून येतो. तरीही ढोबळ मानाने सांगावयाचे झाल्यास इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका या देशातील औद्योगिकीकरण पहिल्या प्रकारात मोडते. रशिया व चीन या देशातील औद्योगिकीकरण दुसऱ्या प्रकारात मोडते. तर जर्मनी, जपान व भारत या देशांतील औद्योगिकीकरण तिसऱ्या प्रकारात येते.

**औद्योगिकीकरणास सहायक घटक -**

कोणत्याही देशातील औद्योगिकी करणची क्षमता आणि विकासाची गती ही त्या देशातील औद्योगिकीकरणास सहायक किंवा पूरक घटकांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. नैसर्गिक साधने, आर्थिक संसाधने, मानव संसाधने, उद्योजकता, बाजारपेठ, तंत्रज्ञान, नवप्रवर्तक मूलभूत सोयी, कृषी क्षेत्राचा विकास आणि शासकीय धोरण हे घटक औद्योगिकीकरणास सहाय्यभूत ठरतात.

(१) मानवाच्या मर्यादित गरजा
(२) मानवी अवस्थेची प्रगती
(३) शिकारी अवस्था ते व्यापार
(४) देवाणघेवाणीसाठी चलनाचा उपयोग
(५) इ.स.पूर्व काळात औद्योगिक विकास
(६) सिंधू संस्कृतीतील औद्योगिक विकास
(७) वैदिक काळातील व्यापार विकास
(८) मौर्य साम्राज्यातील विदेशी व्यापार विकास
(९) लघुउद्योग, हस्तउद्योग, कुटीर उद्योग विकास
(१०) ब्रिटीशकालीन व्यापार विकास
(११) सूतगिरण्या, पोलाद, औद्योगिक विकास

भारतात विविध उद्योगधंद्यांची वाढ झालेली दिसून येते. यामध्ये अनेक प्रकारचे छोटे-मोठे उद्योग आहेत. कोणताही उद्योग असला तरी त्यांच्या संख्येत वाढ होणे म्हणजे उद्योगधंद्यांची वाढ होय. 'वाढ' आणि 'विकास' हे दोन्ही शब्द आलटून-पालटून एकाच अर्थाने उपयोगात आणले जातात. परंतु, एलिझाबेथ हॅरालक यांनी या दोन्ही शब्दातील फरक उत्तमरित्या स्पष्ट केला आहे. त्यांच्या मते, 'वाढ' या शब्दात परिमाणात्मक (संख्यात्मक) (quantitative) अर्थ अभिप्रेत असतो तर, 'विकास' या शब्दात गुणात्मक अर्थ (qualitative) अभिप्रेत असतो.

उद्योगधंद्याची वाढ म्हणजेच परिणामात्मक बदल होय. देश, जिल्हा, तालुका आणि गाव या पातळ्यांवर ज्या प्रमाणात उद्योगधंद्यांची वाढ होते, त्या प्रमाणात हा परिणात्मक बदल दिसून येतो. याच संख्यात्मक वाढीला उद्योगधंद्यांची वाढ असे म्हणतात.

**उद्योगधंद्याचा विकास -**

'उद्योगधंद्याचा विकास' या शब्दात गुणात्मक (qualitative) असा अर्थ अभिप्रेत असून 'विकास' ही संज्ञा व्यापक आहे.

विकासाचे अनेक पैलू आहेत. विकास हा सर्वांगीण स्वरूपाचा असतो. तो क्रमाक्रमाने प्रगतशील असतो. परिपक्वता साधणे हा विकासाचा मुख्य उद्देश असतो. परिपक्वतेच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल विकास साधत असते. उद्योगधंद्यांचा विकास हा विविध बाबींवर अवलंबून असतो. या बाबी खालीलप्रमाणे -

(१) पायाभूत घटक (२) आर्थिक संसाधने (३) उपलब्ध भूखंड (४) भौगोलिक परिस्थिती (५) मानव संसाधन (६) उपयोजक (७) उपयोजकांच्या गरजा (८) इतर आवश्यक बाबी

## १.१.२ औद्योगिकीकरणाची आवश्यकता

**स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय उद्योग विकास -** प्राचीन काळी अन्न, वस्त्र, निवारा अशा मानवाच्या गरजा मर्यादित असल्यामुळे व्यापाराचे अस्तित्व नव्हते. त्या काळात मानव निसर्गाच्या सानिध्यात राहून व मिळालेली कंदमुळे खाऊन आपला उदरनिर्वाह करीत असे. त्या काळात मानव कापड म्हणून झाडांची पाने आणि चामड्याचा उपयोग करीत असे. निवाऱ्यासाठी गुहेत किंवा आडोश्याला राहत असे.

**औद्योगिकरणाची आवश्यकता**
स्वातंत्र्योत्तर काळातील उद्योगांचा विकास
**सार्वजनिक क्षेत्र**
सार्वजनिक क्षेत्राची भूमिका
१. आर्थिक विकासाचा वेग वाढविणे
२. समतोल प्रादेशिक विकास घडवून आणणे
३. लोकोपयोगी सेवा उपलब्ध करणे
४. उत्पन्न आणि संपत्तीचे केंद्रीकरण थांबविणे
**खाजगी क्षेत्र**
(१) एकल व्यापारी
(२) भागीदारी संस्था
(३) संयुक्त स्कंध प्रमंडळ
(४) सहकारी संस्था
(५) खाजगी क्षेत्राची भूमिका
(६) संयुक्त क्षेत्र
**सरकारी किंवा सार्वजनिक क्षेत्र**
(१) विभागीय उपक्रम
(२) सार्वजनिक किंवा वैधानिक महामंडळ
(३) सरकारी प्रमंडळ

हळूहळू मानवाचा विकास होऊन प्राचीन मानव प्रगती करू लागला. सुरुवातीला शिकार, त्यानंतर पशुपालन आणि यानंतर कृषी व व्यापार अशी प्रगती मानवाने केली. शेती व्यवसाय हाच व्यापाराची जननी मानल्या जाते. त्यानंतर वस्तू रूपाने देवाण-घेवाण म्हणजेच वस्तूविनिमय आणि पुढे खरेदी-विक्रीची क्रिया सुरू झाली. यातूनच कालांतराने चलनाचा उपयोग होऊ लागला. खरेदी-विक्रीसारख्या व्यावहारिकतेचा जन्म झाला.

काळ बदलला, तसा व्यापार वाढू लागला. व्यापार सोयीचा असल्यामुळे त्याला सर्वच बाजूंनी चांगले बळ मिळाले. भारतात इ.स. पूर्व २३५० ते १७५० या काळात व्यापार व उद्योगांचा चांगला विकास झाल्याची साक्ष इतिहास देतो. या काळात संस्कृतीला महत्त्व होते आणि सिंधू संस्कृतीमध्ये शिकारी अवस्था, पशुपालन अवस्था व कृषी अवस्था हे टप्पे मानवाने ओलांडलेले दिसून येतात. सिंधू संस्कृतीमध्ये कापड विणणे, तलम कापड विणणे, विविध धातूंची कलाकुसर असलेली भांडी व खेळणी बनविणे, सोन्या-चांदीचे अलंकार घडविणे इत्यादी कला मानवाला अवगत होत्या. सिंधू संस्कृतीतच व्यापार भरभराटीस येऊन त्याचा विकास झाला होता. या संस्कृतीत शेतमालाची निर्यात इतर देशातही होत असे.

यानंतर वैदिक काळात आर्यांनी इ.स.पूर्व १२०० मध्ये व्यापारामध्ये चांगली प्रगती केली होती. वैदिक युगानंतरच्या मौर्य साम्राज्याच्या काळातही भारतात अंतर्गत व विदेशी व्यापार विकसित झाला होता. म्हणूनच मौर्य साम्राज्याला 'सुवर्ण युग' म्हटले जाते. या काळात राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि व्यापारी सुसंपन्नता होती.

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात लघु, हस्त व कुटीर उद्योगांचा उत्तम विकास झाला होता. १७५७ मध्ये ब्रिटिशांनी ईस्ट इंडिया कंपनीची भारतात स्थापना करून मुघल शासनकर्त्यांकडून विविध प्रकारचे करार केले. इंग्रजांनी भारतात प्रवेश केला तोच व्यापारी म्हणून ...... भारतात व्यापारी म्हणून आलेले इंग्रज राज्यकर्ते झाले. इंग्रजांचे धोरण भारतासाठी पोषक नव्हते. याचमुळे भारतातील पारंपरिक हस्तोद्योग व व्यवसायांचा ऱ्हास झाला. १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती होऊन लघुद्योगांची जागा मोठ्या उद्योगांनी घेतली. यंत्राचा शोध लागून यंत्राचा वापर होऊ लागला. कारखान्यात यंत्राचा उपयोग होऊ लागल्यामुळे नवनवीन कारखाने उदयास आले. इंग्लंडच्या मालाला भारतासारखी मोठी बाजारपेठ प्राप्त झाली. इंग्रजांनी राज्यकर्ते म्हणून भारतात पाय रोवल्यामुळे थोड्याच कालावधीत भारतात अनेक कारखाने सुरू झाले. मुंबईत काही महत्त्वाच्या ठिकाणी सुतगिरण्या

उभारण्यात आल्या. मुंबई, सुरत, कलकत्ता येथे तागगिरण्या उभारण्यात आल्या. त्यानंतर भारतात पोलाद, कोळसा, औषधनिर्मिती उद्योगांना सुरुवात झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध पंचवार्षिक योजनांमुळे उद्योगांचा विकास सुरू झाला आणि नंतरच्या काळात या विकासात भरत पडत गेली.

**स्वातंत्र्योत्तर काळातील उद्योगांचा विकास**

१९४८ मध्ये भारत सरकारने औद्योगिक धोरणाविषयीची पहिला प्रस्ताव मांडला. मिश्र अर्थव्यवस्थेची रचना, सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्राच्या कार्याची दिशा या धोरणात ठरविण्यात आली. खाजगी क्षेत्राच्या कार्याची दिशा या धोरणात ठरविण्यात आली. भारताचा संभाव्य आर्थिक विकास साधण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्था हा एकमेव पर्याय असल्याचे या धोरणात स्पष्ट करण्यात आले होते. १९५६ मध्ये संशोधित औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेतील तत्त्वप्रणालीचा अवलंब करण्यात आला. या उद्दिष्टाच्या ध्येयाला पूर्ण करण्यासाठी उद्योगांचे सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र व संयुक्त क्षेत्र असे तीन भागांत वर्गीकरण करण्यात आले.

## सार्वजनिक क्षेत्र

याच क्षेत्राला शासकीय क्षेत्र असेही म्हटले जाते. ज्या क्षेत्रावर शासनाची मालगी, नियंत्रण असूनही त्याचे व्यवस्थापन देखील शासनच करते, त्यास सार्वजनिक क्षेत्र म्हटले जाते. या क्षेत्राच्या सहाय्याने विकासाच्या बऱ्याच प्रक्रिया राबविल्या जातात. या क्षेत्राची प्रमुख कार्ये खालीलप्रमाणे आहेत -

**(१)आर्थिक विकासाचा वेग वाढविणे** - आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी जलद औद्योगिकीकरणाची आवश्यकता असते. औद्योगिकीकरण होण्यासाठी लोहपोलाद, अवजड यंत्रे, रसायने, विद्युत, कोळसा, मिश्र खते अशा मूलभूत आणि आधारभूत उद्योगधंद्यांचा विकास होणे आवश्यक असते. अशा उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्याची जोखीम खाजगी उद्योजक स्वीकारत नाहीत. अशावेळी शासनच या उद्योगांची सार्वजनिक क्षेत्राच्या स्थापनेत पुढाकार घेऊन औद्योगिकीकरणास चालना देते. स्वातंत्र्यनंतरच्या पहिल्या तीन दशकांत सार्वजनिक क्षेत्रामुळेच भारतात जलद ओद्योगिकीकरण झाले. याच काळात भारत सरकारने मूलभूत व आधारभूत उद्योगात प्रचंड गुंतवणूक करून जलद औद्योगिकीकरणास चालना दिली. एवढेच नव्हे तर १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर सार्वजनिक क्षेत्रात औद्योगिकीकरणाचा आधार मजबूत करण्याची जबाबदारी स्वीकारली.

**(२) समतोल प्रादेशिक विकास घडवून आणणे** - विकासातील असमतोल दूर करणे ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. भारतातील बिहार, ओरिसासारख्या इतर राज्यांतील आर्थिक विकास महाराष्ट्र, गुजरात, पंजाब तसेच दाक्षिणात्य राज्यांच्या तुलनेत कमी आहे. अशा असमतोलामुळे बऱ्याच आर्थिक समस्या निर्माण होऊन विकासाला अडथळा निर्माण होत असतो. अशा वेळी सार्वजनिक क्षेत्र ग्रामीण आणि मागास भागांत गुंतवणूक वाढवून विद्युत, पाणीपुरवठा, वाहतूक, दळणवळणसारख्या मूलभूत सोयी औद्योगिकीकरणासाठी उपलब्ध करून देते. अशा प्रकारे सार्वजनिक क्षेत्रांतर्गत मागास भागात उद्योगांची निर्मिती करून शासन विकासातील असमतोल दूर करते. स्वातंत्र्यानंतर सार्वजनिक क्षेत्रांत विकासातील प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे सतत प्रयत्न करण्यात आले.

**(३)लोकोपयोगी सेवा उपलब्ध करणे** - देशातील सर्वसामान्य जनतेला आरोग्य सुविधा, रेल्वे, संदेशवहन, पाणीपुरवठा, विद्युत, वाहतूक, दळणवळण, शिक्षण या व अशा अनेक प्रकारच्या सोयींच्या उपलब्धतेची आवश्यकता असते. या लोकोपयोगी सेवा माफक दरात जनतेला उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्राची असते. सर्व आर्थिक क्षेत्रातील उत्पादनांसाठी पायाभूत सेवा पुरविणे हा सार्वजनिक क्षेत्राचा दुसरा मुख्य हेतू आहे. तसेच उत्पादने बाजारात जलद पोहचवून उपभोक्त्यांचे शोषण होणार नाही, हा देखील त्यामागील महत्त्वाचा हेतू आहे.

**(४)उत्पन्न आणि संपत्तीचे केंद्रीकरण थांबविणे** - खाजगी क्षेत्रात सर्वच आर्थिक व्यवहारात भाग वाढला तर मोजक्याच लोकांच्या हातात उत्पन्न आणि संपत्तीचे केंद्रीयकरण होऊन आर्थिक विषमता निर्माण होते. अशा वेळी सार्वजनिक क्षेत्र उद्योगधंद्याची निर्मिती करून खाजगी क्षेत्राची मक्तेदारी कमी करण्याची महत्त्वाची भूमिका पार पाडते. या उद्योगनिर्मितीमुळे उत्पन्न आणि संपत्तीचे होणारे केंद्रीयकरण आणि आर्थिक विषमता रोखली जाऊन सर्वसामान्यांचे हित साधल्या जाते.

## खाजगी क्षेत्र

ज्या क्षेत्रावर खाजगी उद्योजकांची मालकी व नियंत्रण असते. तसेच व्यवस्थापनही खाजगी उद्योजकच करतात. त्यास खाजगी क्षेत्र असे म्हणतात. सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेले उद्योग सोडून उरलेल्या उद्योगात खाजगी क्षेत्र सहभागी होऊ शकते. परंतु, शासनाने ठरवून दिलेल्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या चौकटीतच राहून शासनाच्या नियंत्रणाखाली खाजगी क्षेत्राला काम करावे लागते.

**खाजगी क्षेत्राची भूमिका व कार्ये**

(१) सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेले उद्योग सोडून इतर उद्योगांची निर्मिती करून त्यात वाढ करणे.

(२) सर्व उपभोग्य वस्तूंचे तसेच भांडवली वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांची निर्मिती करणे.

(३) वेगवेगळ्या उद्योगात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून औद्योगिक क्षेत्रातील विविध प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन करणे.

(४) भारतीय उद्योगास लागणारे विदेशी भांडवल आणि तंत्रज्ञान मिळविण्यासाठी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक व रोखे गुंतवणूक यासंबंधी करार देणे.

(५) अधिक उत्पादन व रोजगारांची निर्मिती करणे.

**खाजगी . क्षेत्रातील कार्यरत व्यापारी संस्था**

(१) एकल व्यापारी संस्था (sole trader) (२) भागीदारी संस्था (partnership firm)

(३) संयुक्त स्कंध प्रमंडख (join stock company) (४) सहकारी संस्था (co-operative society)

१९४८ व १९५६ च्या औद्योगिक धोरणात भारत सरकारने मिश्र अर्थव्यवस्थेचा अंगीकार केला. याच अर्थव्यवस्थेच्या आधारावरच व्यावसायिक संघटनेत खाजगी क्षेत्र हा एक प्रमुख भाग आहे. या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थांची माहिती खाली दिलेली आहे.

**(१)एकल व्यापारी संस्था** (sole trader) - व्यापाराची सुरुवात एकल व्यापारापासूनच झाली. हे व्यापारी संस्थेचे प्रारंभिक स्वरूप होय. या व्यापारात एकच व्यक्ती कार्यरत असून व्यवसायाचा मालकी हक्कदेखील त्याच व्यक्तीकडे असतो. या व्यापारासाठी असलेले भांडवल एकच व्यक्ती उभारते आणि व्यवसायाचे संचालनदेखील तीच व्यक्ती करते. व्यवसायात सहकारी म्हणून नोकरवर्ग असला तरी व्यवसायाची जबाबदारी एकाच व्यक्तीची असते. व्यवसायात होणाऱ्या नफ्या-तोट्याची जबाबदारी त्याचीच असते. कायद्याने सक्षम ठरविलेली कोणतीही व्यक्ती एकल पद्धतीने व्यवसाय करू शकते. **चार्ल्स गर्स्टनबर्ग** यांच्या मते, 'एकल व्यापार असा व्यापार आहे जो एकाच व्यक्तीद्वारे सुरू करण्यात येतो. तीच व्यक्ती व्यापाराचे संचालन करून व्यवसायातील नफा-तोट्याला जबाबदार असते.'

**लुई हॅने** यांच्या मते, 'एकल व्यवसायाचे स्वरूप असे आहे की ज्यात एकच व्यक्ती प्रमुख असून सर्व व्यावसायिक कार्यासाठी उत्तरदायी असतो. तोच व्यवसायाचे संचालन करतो आणि लाभ-हानीचा सर्व भार उचलतो.'

अशा प्रकारे व्यवसाय संघटनेत एकच व्यक्ती मालक, नियंत्रक आणि व्यवस्थापक असून व्यवसायाची जबाबदारी पेलणारी असल्यामुळे त्याला एकल व्यापार असे म्हणतात.

**एकल व्यापाराची वैशिष्ट्ये** - एकल व्यापारांची प्रामुख्याने खालील वैशिष्ट्ये दिसून येतात

(१)एकाच व्यक्तीची मालकी, (२) व्यवसाय प्रारंभाचे स्वातंत्र्य, (३) एकाच व्यक्तीची आर्थिक संसाधने, (४) एकाच व्यक्तीची व्यवसायातील अमर्यादित देयता, (५) मर्यादित कार्यक्षेत्र

**एकल व्यापराचे फायदे** - एकल व्यापाराचे फायदे किंवा गुण खालीलप्रमाणे आहेत.

(१) व्यापार स्थापनेत सुलभता, (२) निर्णय स्वातंत्र्याचा अधिकार, (३) नफ्यावर एकाधिकार, (४) ग्राहकाशी प्रत्यक्ष संबंध, (५) निर्णय गुप्त ठेवण्याची सक्षमता, (६) खर्चात काटकसर, (७) मक्तेदारी निर्माण नाही.

**एकल संस्थांची उपयुक्तता -** एकल व्यापाराची उपयुक्तता खालीलप्रमाणे सांगता येईल

(१) व्यवसायातील मर्यादित कार्यक्षेत्र. (२) स्वतःच ग्राहकाकडे लक्ष पुरविता येते.

(३) स्वतःच निर्णय घेता येतात. (४) स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होते.

(५) व्यवसायात मर्यादित जोखीम असते. (६) उपलब्ध भांडवलात व्यवसाय सुरू करता येतो.

**(२) भागीदारी संस्था** (partnership firm)

दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र येऊन कार्य करणे म्हणजेच भागीदारी होय. भागीदारीत दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती नफा कमविण्याच्या उद्देशाने संस्था निर्माण करतात. १९३२ मध्ये भागीदारीचा कायदा तयार करण्यात आला. त्यात भागीदारीची पुढील व्याख्या नमूद केली आहे.

'सर्वांतर्फे एकाने काहींनी किंवा सर्वांनीच चालविलेल्या व्यवसायातील नफ्याची आपसात वाटणी करण्याचे ज्या व्यक्तींनी ठरविले आहे. त्या सर्व व्यक्तींच्या परस्परसंबंधाला भागीदारी असे म्हणतात.'

भागीदारीत दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्रित येतात. भांडवलाची गुंतवणूक करतात. एकत्र आलेल्या व्यक्तींनी समप्रमाणात भांडवल गुंतवलेच पाहिजे असे नसते. भागीदारीमध्ये आपसात करार होतात आणि संबंधित सर्वच भागीदार लाभ आणि हानीकरिता जबाबदार असतात. भागीदारीमध्ये उद्योग व्यवसायाच्या मालकांना 'भागीदार' असे म्हणतात.

**भागीदारीची वैशिष्ट्ये**

भागीदारीमध्ये किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असून त्यांचे कायदेशीर अस्तित्व असते. यामध्ये नफा मिळविण्याचे उद्दिष्ट्य असून भागीदार भागीदारी संस्थेचे प्रतिनिधी असतात. भागीदाराला भागीदारीपासून स्वतंत्र अस्तित्व नसते. आपापसातील कराराद्वारे ही संस्था निर्माण होते.

**(३)संयुक्त स्कंध प्रमंडळ** (joint stock company)

१९५६ मध्ये भारतीय कंपनी पारित कायद्यानुसार संयुक्त स्कंध प्रमंडळाची स्थापना करण्याचा कायदा निर्माण करण्यात आला. या कायद्यानुसार संयुक्त स्कंध प्रमंडळ म्हणजे कंपनी कायद्यानुसार किंवा पूर्वीच्या कायद्याखाली स्थापना केलेली, नोंदवलेली अथवा अस्तित्वात असलेली संस्था होय.

**प्रो. हॅने** यांनी केलेल्या व्याख्येनुसार, कंपनी ही ऐच्छिक संघटना असते. ती जनतेला भाग वितरित करून भांडवल गोळा करते. भागधारक कंपनीचे सभासद असतात. कंपनीचा मुख्य उद्देश नफा कमविणे हाच असतो.

या व्याख्येवरून, संयुक्त स्कंध प्रमंडळ म्हणजे हस्तांतरित भागांमध्ये विभागलेले भांडवल असलेली, मर्यादित दायित्व असणाऱ्या सभासदांव्यतिरिक्त स्वतंत्र अस्तित्व असलेली व नफा मिळविण्याच्या उद्देशाने व्यवसाय करण्यासाठी कायद्याद्वारे निर्माण केलेली संघटना होय.

**प्रमंडळाची वैशिष्ट्ये -**

प्रमंडळाची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

(१) स्वतंत्र अस्तित्व (२) सक्तीची नोंदणी (३) भागभांडवल (४)सर्वसामान्य नाममुद्रा (५) ऐच्छिक संघटना (६) अंशाच्या हस्तांतरणाची सोय (७) चिरकालीन अस्तित्व (८) अंशधारांची विशाल संख्या

**(४) सहकारी संस्था** (co-operative society)

'बिना सहकार नाही उद्धार' हे घोषवाक्य सत्य आहे. सहकाराशिवाय विकास नाही. म्हणूनच भारतात विविध सहकारी संस्थांची स्थापना झालेली आहे. आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी सहकारी चळवळी सुरू झाल्या. सहकारी चळवळीतूनच भारत देश स्वतंत्र झाला. एकत्रितपणे कोणतेही कार्य करणे, हा सहकाराचा सर्वसामान्य अर्थ होय. सहकारात दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रितपणे विशिष्ट कार्य करतात आणि त्या व्यक्तींना संयुक्त प्रयत्नांना फायदा मिळतो. सहकारी तत्त्वावर कार्य करणे, हे भारतासाठी काही नवीन नाही. पुरातन काळापासून भारतात एकीचे बळ या तत्त्वाचे पालन करण्यात येत आहे. भारतातील संयुक्त

कुटुंब पद्धती हे व्यावहारिक सहकार्याचे उत्तम उदाहरण आहे. संयुक्त कुटुंब पद्धतीत कुटुंबातील सर्व सभासद एकत्रितपणे खर्च करतात. प्राचीन काळात कृषीप्रधान देशात फड हे शेतकऱ्यांचे गट होते. भारतात आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी सहकारी चळवळ सुरू करण्यात आली. विविध देशात अनेक प्रकारच्या आर्थिक अडचणी होत्या. परिस्थितीनुसार सहकारी चळवळी निर्माण झाल्या आणि विकास हाच सहकारी चळवळीमागील मुख्य हेतू होता आणि आहे.

**हेरिक** यांच्या मतानुसार, 'स्वखुशीने एकत्रित आलेल्या व परस्परांच्या व्यवस्थापनांतर्गत स्वत:ची शक्ती, साधनसंपत्ती किंवा दोन्हीही सर्वसाधारण नफ्यासाठी किंवा तोट्यासाठी उपयोगात आणण्याचे कार्य म्हणजे सहकार'

सहकारमध्ये 'प्रत्येकासाठी सर्व आणि सर्वांसाठी प्रत्येक ' या तत्त्वानुसार कार्य करतात. परस्पर सहकार्यातून एकमेकांचा विकास घडवून आणला जातो. सहकार हे ऐच्छिक संघटन असून त्यामध्ये खुले सभासदत्व, लोकशाही शासन, सेवावृत्ती, समानता, परस्पर सहकार्याची भावना आणि राजकीय-धार्मिक तटस्थता साधली जाते. त्याचबरोबर आर्थिक व सामाजिक विकासाचे ध्येयदेखील सहकारितेतून साध्य केले जाते.

**सहकारी संस्थांचे प्रकार**

(१) सहकारी पतपेढी (२) उपभोक्ता सहकारी संस्था (३) औद्योगिक सहकारी संस्था (४) सहकारी विपणन संस्था (५) सहकारी शेती संस्था (६) सहकारी गृहनिर्माण संस्था

**संयुक्त क्षेत्र**

ज्या उद्योगात सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र संयुक्तपणे सहभागी असतात, त्यास संयुक्त क्षेत्र असे म्हणतात.

या क्षेत्रात खालील उद्योगांचा समावेश आहे -

(१)यंत्रसामुग्री (२) रसायने (३) मिश्र खाते (४) रस्तेवाहतूक (५)सिमेंट (६) खनिज

संयुक्त क्षेत्राला या उद्योगात सहभागी होण्यास परवानगी दिली असली तरी या उद्योगांची प्रगती समाधानकारक नसल्यास शासन अशा उद्योगांचे अधिग्रहण करू शकते.

## १.१.३ भारतातील मोठे उद्योग

लोहपोलाद, कापूस व कृत्रिम कापड, ताग उद्योग, साखर, सिमेंट, कागद, पेट्रोकेमिकल्स अशा उद्योगांचा समावेश भारतातील प्रमुख उद्योगांमध्ये केला जातो.

**(१) लोहपोलाद उद्योग -** १९४७ मध्ये भारतात टाटा आयर्न अॅण्ड स्टील कंपनी, जमशेदपूर (TISCO) व इंडियन आयर्न अॅण्ड स्टील कंपनी (ISCO) यांनी लोखंड व पोलादाचे उत्पादन सुरू केले. या उद्योगांचा प्रमुख हिस्सा सरकारी पोलाद कारखान्यांचा आहे. १९५६ मध्ये औद्योगिक धोरणात लोहपोलाद उद्योगांचा समावेश सूची 'अ' मध्ये करण्यात आला.

१९५४ मध्ये जर्मनीच्या सहकार्याने राऊरकेला येथे, १९५५ मध्ये भिलई येथे रशियाच्या सहकार्याने आणि १९५६ मध्ये ब्रिटिश कंपनीच्या सहकार्याने भारतात लोहपोलाद कारखाने सुरू करण्यात आले. भारतात १९७४ मध्ये भारतीय पोलाद प्राधिकरणाची (steel authority of India) स्थापना करण्यात येऊन या मंडळाकडे पोलाद उद्योगाच्या विकासाची जबाबदारी सोपविण्यात आली. या मंडळाच्या नियंत्रणाखाली भारतात बोकारो, हिंदुस्थान स्टील, सालेम स्टील, हिंदुस्थान स्टील वर्क्स कन्स्ट्रक्शन लि., आणि नॅशनल मिनरल डेव्हलप्मेंट कार्पोरेशन या कारखान्यांची स्थापना व विकास करण्यात आला.

**(२) कापूस व कृत्रिम कापड उद्योग -** १९२० पासून भारतात सूती कापड उद्योगाची सुरुवात झाली. सूती कापड उद्योगांमध्ये सूतगिरण्या, हलक्या प्रतीच्या कापडाच्या मध्यम संयुक्त गिरण्या आणि उच्च व अति उच्च कापडाच्या संयुक्त गिरण्या अशी विभागणी करण्यात आली. कापूस व कृत्रिम कापड उद्योग हा भारतातील सर्वांत जुन्या उद्योगांपैकी आहे. १९९४ मध्ये भारतात ११७५ कापड गिरण्या होत्या. त्यापैकी ९०६ सूतगिरण्या तर २६९ संयुक्त गिरण्या होत्या. या कापड गिरण्यांपैकी १३२ गिरण्या बंद होत्या.

**(३) ताग उद्योग -** १८८५ मध्ये भारतात ताग उद्योगाला सुरुवात झाली. परकीय चलन प्राप्त करण्याच्या दृष्टीने ताग उद्योगाचे महत्त्वाचे स्थान आहे. भारतात तागाच्या एकूण ६९ गिरण्या असून त्या सर्व पश्चिम बंगालमध्ये एकवटलेल्या आहे.

**(४) साखर उद्योग -** १९३७ पासून भारतात साखर उद्योगाची सुरुवात करण्यात आली. भारतात साखर उद्योग प्रगतीपथावर आहे. साखरेच्या उत्पादनात भारताचा जगात चौथा क्रमांक असून १९३२ मध्ये देशात ३२ साखर कारखाने होते. साखर उद्योगामुळे सरकारला मोठ्या प्रमाणात उत्पादन शुल्काच्या रूपात महसूल मिळतो. सद्यस्थितीत भारतात ४२० साखर कारखाने आहेत.

**(५) सिमेंट उद्योग -** भारतात १९१४ मध्ये गुजरातमधील पोरबंदर येथे सिमेंट निर्मितीचा पहिला कारखान सुरू झाला. सध्या देशात २० मोठे व १४० लघु सिमेंट कारखाने आहेत. सिमेंट उत्पादनात भारताचा जगात सातवा क्रमांक आहे. भारतात सिमेंट उद्योगात सार्वजनिक क्षेत्र, एसीसी, बिर्ला, दालमिया, जैन, माणिकगड, अंबुजा, अल्ट्राटेक इत्यादी कारखान्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील विदर्भात गडचांदूर येथे सिमेंट कारखाने आहे.

**(६) कागद उद्योग -** १९२५ मध्ये भारतात कागद उद्योगाची सुरुवात करण्यात आली असून आर्थिक विकासात कागद उद्योगाने झपाट्याने प्रगती केली आहे. सध्या भारतात कागद उद्योगाचे ३४० कारखाने असून हे सर्व कारखाने खाजगी क्षेत्रात आहेत. विदर्भात बल्लारपूर येथील 'थ्रीएक्का पेपर मिल' प्रसिद्ध आहे.

**(७) पेट्रोकेमिकल्स उद्योग -** या उद्योगचे सामान्य माणसाच्या जीवनात महत्त्व आहे. कापड, बादल्या, डबे, चप्पल अशा सामान्य माणसाच्या जीवनात उपयुक्त असणाऱ्या तसेच स्वस्त किमतीच्या अनेक वस्तूंमध्ये पेट्रोकेमिकल्स वापरल्या जाते. वर्तमानकाळात प्लॅस्टिक पॅकेजिंग, सिंचनाचे पाईप, रबरी नळ्या, इमारत बांधकाम इत्यादींमध्ये देखील पेट्रोकेमिकल्सचा वापर होऊ लागला आहे.

नॅशनल ऑरगॅनिक केमिकल्स इंडस्ट्रिज, युनियन कार्बाइड, इंडियन पेट्रोकेमिकल्स कार्पोरेशन लि. यामुळे या उद्योगांचा प्रारंभ झाला. यामध्ये प्लॅस्टिक उद्योगांचाही समावेश होतो. महाराष्ट्रातील गॅस क्रॅकर कॉम्प्लेक्स, नागोठाणे, हल्दिया पेट्रोकेमिकल्स, सलीमपूर कॉम्प्लेक्स, रिलायन्स पेट्रोकेमिकल्स व खाजगी क्षेत्रातील नवीन पेट्रोकेमिकल्स उद्योगांचा समावेश होतो.

## १.१.४ स्वातंत्र्योत्तर काळातील औद्योगिक धोरण -

स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या आर्थिक विकासासाठी नवीन औद्योगिक धोरण ठरविण्यात आले. १९४८ मध्ये पहिले औद्योगिक धोरण निश्चित करण्यात आले. या औद्योगिक धोरणांचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

**(१) १९४८ चे औद्योगिक धोरण**

(अ)या औद्योगिक धोरणाप्रमाणे देशात मिश्र अर्थव्यवस्था गृहीत धरण्यात आली. यामध्ये औद्योगिक क्षेत्राचे सार्वजनिक क्षेत्र उद्योग व खाजगी क्षेत्र उद्योग असे दोन भाग करण्यात आले.

(ब) लष्करी दारूगोळा, अणुशक्ती, रेल्वे हे उद्योग पूर्णत: सार्वजनिक क्षेत्रात ठेवण्यात आले, तर लोहपोलाद, कोळसा, विमाननिर्मिती, जहाजबांधणी, टेलिफोन सेवा यासारखे उद्योग खाजगी क्षेत्रात ठेवण्यात आले. पण नवीन उद्योग मात्र पूर्णत: सार्वजनिक क्षेत्रात स्थापन करण्यात आले.

(क) ज्या उद्योगांचे सरकार नियोजन व नियंत्रण करू शकतील, अशा मूलभूत उद्योगांचा समावेश तिसऱ्या गटात करण्यात आला.

(ड) उर्वरित सर्व उद्योग खाजगी क्षेत्रासाठी खुले ठेवण्यात आले.

**(२) १९५६ चे औद्योगिक धोरण**

१९५६ मध्ये भारत सरकारने १९४८ च्या धोरणात बदल व थोडी सुधारणा करून औद्योगिक धोरणाचा प्रस्ताव संसदेत सादर करून ठराव मंजूर करण्यात आला. यात उद्योगाचे नवे वर्गीकरण करण्यात आले.

(अ) लष्करी व इतर सतरा महत्त्वाच्या उद्योगांचा समावेश पूर्णत: सरकारी क्षेत्रासाठी राखीव उद्योग म्हणून करण्यात आला. यात दारूगोळा, लष्करी साधने, अणुशक्ती, लोहपोलाद, अवजड यंत्रे व विद्युत यांत्रिकी, दगडी कोळसा, खनिज तेल, विमानबांधणी, रस्ता वाहतूक, रेल्वे वाहतूक, जहाजबांधणी, दूरसंचार साधने, विद्युत हे उद्योग सरकारी क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यात आले.

(ब) नवीन क्षमता सरकार निर्माण करून त्यामध्ये प्रचलित खाजगी उद्योग सुरू राहतील अशा बारा क्षेत्रातील उद्योगांचा समावेश करण्यात आला. यंत्रसामुग्री, खाणकाम, ॲल्युमिनिअम, लोहमिश्र धातू व पोलाद उपकरणे, रासायनिक उद्योग, औषधे, खते, कृत्रिम रबर, रस्ते वाहतूक, जलवाहतूक अशा उद्योगांचा समावेश करण्यात आला.

**(३) १९९१ चे औद्योगिक धोरण**

२४ जुलै १९९१ रोजी औद्योगिक विकासाच्या दृष्टीने केंद्र शासनाने नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले. देशातील उद्योगधंद्याच्या वाढीस व तांत्रिक प्रगतीस पोषक वातावरण तयार करणे व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरण्याची क्षमता निर्माण करणे, हा या नवीन औद्योगिक धोरणामागचा हेतू होता.

**औद्योगिक धोरणाची वैशिष्ट्ये**

(१) या औद्योगिक धोरणानुसार औद्योगिक परवाने, परकीय भांडवल गुंतवणूक, परकीय तंत्रज्ञान, सार्वजनिक उद्योगाविषयीचे धोरण यांसारख्या बाबतीत अनेक क्रांतिकारक निर्णय घेण्यात आले.

(२) विशिष्ट प्रकारचे १८ उद्योग वगळता इतर सर्व उद्योगांसाठी असलेली परवाना पद्धत रद्द करण्यात आली. महानगरपालिका वगळता उद्योगधंद्यासाठी जागेची निवड करण्यावरील निर्बंध दूर करण्यात आले.

(३) ४० टक्क्यांपर्यंतची परकीय भांडवल गुंतवणुकीची मर्यादा शिथिल करण्यात येऊन ही मर्यादा ५१ टक्के करण्यात आली.

(४) धोरणात्मक बाबी, उच्च तंत्रज्ञान व मूलभूत सोयी यांवर लक्ष केंद्रीत करण्याच्या दृष्टिकोनातून सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीचा फेरविचार करण्यात येत आहे.

(५) आजारी उद्योगांचे पुनरुज्जीवन व पुनर्वसन करण्यासाठी औद्योगिक पुनर्उभारणी मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(६) मक्तेदारी पद्धतीचे निर्मुलन करण्यासाठी व संबंधित आयोगास दंडात्मक व भरपाईचे अधिकार वापरता यावेत, म्हणून यासंबंधी व्यापार अधिनियमात दुरुस्त्या करण्यात येत आहे.

(७) ज्या प्रकल्पासाठी भांडवली आयात मालाची आवश्यकता आहे, अशा प्रकल्पासाठी सहज मान्यता दिली जात आहे.

(८) संरक्षण व लष्करीदृष्ट्या महत्त्वाचे उद्योग यापुढेही सरकारी क्षेत्रातच राहतील.

वरील नवीन औद्योगिक धोरणानुसार देशातील व राज्यातील उद्योगधंद्याच्या वाढीस चालना मिळणे अपेक्षित आहे.

**महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक धोरण -**

**१९९५ चे औद्योगिक धोरण -** १९९५ च्या डिसेंबर महिन्यात महाराष्ट्र शासनाने उद्योग, व्यापार व वाणिज्यविषयक नवीन धोरण जाहीर केले. उदारीकरणाच्या अनुकुलतेनुसार हे धोरण जाहीर करण्यात आले.या धोरणात उदारीकरणास पाठिंबा देत कार्यप्रणालीची पारदर्शकता, सुलभता, विकास कामांमध्ये खाजगी क्षेत्रांचा सहभाग आणि राज्याच्या विकसनशील भागात पायाभूत सुविधांचा विकास या मुद्द्यांवर भर देण्यात आला. या धोरणात पुढील उद्दिष्ट्ये विहीत केलेली होती.

(अ)बुटीबोरी (नागपूर), सिन्नर (नाशिक), नांदगांवपेठ (अमरावती), वाळूंज-शेंद्रे (औरंगाबाद), कुशनुर (नांदेड), कागल-हातकणंगले (कोल्हापूर), महाड (रायगड), इंदापूर (पुणे) इत्यादी नऊ ठिकाणी पायाभूत सुविधांनी युक्त अशी औद्योगिक संकुले उभारणे.

(ब) या नऊ औद्योगिक क्षेत्रात एक खिडकी पद्धती राबवून संबंधित प्रकल्पांना विशिष्ट कालमर्यादेत मंजुरी देणे.

(क) मेल्ट्रॉन, महाराष्ट्र, लघु उद्योग विकास महामंडळ, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, मॅफको आदी शासन अंगीकृत उपक्रमांच्या खाजगीकरणास प्रोत्साहन देणे.

(ड) धरणे, बंदरे, विद्युत प्रकल्प, रस्ते, पूल यांच्या उभारणीत खाजगी क्षेत्राची मदत घेणे अथवा त्यांना संधी देणे.

(इ) कृषी उद्योगांच्या बाबतीत स्वतंत्र धोरण आखणे.

(ई) महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळाचे दृढीकरण करणे.

(उ) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत राज्याच्या किनारपट्टीवर मासे साठवणुकीसाठी शीतगृहे, गोदामे इत्यादी सुविधांसह मत्सोद्याने उभारणे.

(ऊ) लघु उद्योग सुरू करण्यासाठी बीज भांडवल पुरविणे व बँकेचे अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

**१९९८ चे माहिती तंत्रज्ञान धोरण -** आधुनिक युगात तंत्रज्ञानाची गरज ओळखून १५ ऑगस्ट १९९८ मध्ये महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान धोरण जाहीर करण्यात आले. 'जोडणीतून सशक्तीकरण' हे या धोरणाचे घोषवाक्य होते. संपर्क करण्यासाठी राज्यव्यापी यंत्रणा निर्माण करणे, हा या धोरणाचा गाभा असून माहिती तंत्रज्ञान क्षेत्राबरोबर आधुनिक बाबींशी जुळवून घेऊन महाराष्ट्राची औद्योगिक आघाडी कायम ठेवणे, हा या धोरणामागील मूलभूत उद्देश होता.

माहिती तंत्रज्ञान धोरणाचा भाग म्हणून पुणे, मुंबई, ठाणे व नागपूर याठिकाणी इन्फोटेक पार्क उभारण्याचे राज्य शासनाने ठरविले. पुणे शहराचा 'सायबर सिटी' म्हणून विकास करण्यात आला. मुंबईमध्ये 'हार्डवेअर पार्क' विकसित करण्यात आले. राज्यातील माहिती तंत्रज्ञान उद्योग जागतिक स्पर्धेत उतरविण्यासाठी व या उद्योगांच्या सक्षमतेसाठी शासन प्रयत्न करण्यात आले. मानव संसाधन विकास, पायाभूत सुविधा, व्यापक संगणीकरण यासंदर्भात विविध योजना हाती घेतल्या असून माहिती तंत्रज्ञान उद्योगास सर्वोतोपरी उत्तेजन देण्याचे धोरण राज्य शासनाने अंगीकारले. याबरोबरच जनता व शासन यांच्यामध्ये संगणकीकरणातून संपर्क व संवाद साधण्यात आला.

**२००१ चे नवे औद्योगिक धोरण -** औद्योगिक विकास साधण्यासाठी आणि नवीन उद्योगांच्या स्थापनेसाठी-वृद्धीसाठी महाराष्ट्र शासनाने २००१ मध्ये नवीन औद्योगिक धोरण जाहीर केले. नवीन उद्योगांच्या वृद्धीसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने या नवीन धोरणात संरचनात्मक बदल करण्यात आले. महाराष्ट्रातील उद्योगांमध्ये चैतन्य निर्माण व्हावे यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा अवलंब, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आगेकूच, ज्ञानाधिष्ठित व जैवतांत्रिक उद्योगांना प्रोत्साहन, निर्यात वाढ, पर्यावरण नियोजनास महत्त्व, रोजगारनिर्मिती यावर भर देण्यात आला. पायाभूत सुविधांसाठी गुंतवणुकीचा ओघ गतिमान करणे, हा या धोरणामागील उद्देश होता.

## १.१.५ भारतातील योजनाकालीन औद्योगिक विकास

(Industrial Development of India under Plans)

रॉबिन्स यांचे भारतासंदर्भात 'नियोजन हे आमच्या काळातील रामबाण औषध आहे.'हे विधान अगदी सत्य आहे. भारत हा विकसनशील देश असला तरी देशामध्ये आर्थिक समस्या व गरीबीचे दुष्टचक्र आहेच. भारत हा दीर्घकाळ पारतंत्र्यात राहिल्यामुळे तत्कालीन भांडवलशाही अर्थव्यवस्थेने श्रमिकांचे शोषण तर केलेच पण त्याचबरोबर देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा भरपूर प्रमाणात स्वार्थासाठी उपयोग करण्यात आला. याचाच परिणाम असा झाला की देशात असमतोल अर्थव्यवस्थेचा उदय झाला. भारतात अनेक धर्म व जातीजमाती असल्यामुळे समाजात अनेक सामाजिक प्रश्न होते. या सामाजिक प्रश्नांनी समाज त्रस्त होता. सद्यस्थितीतही हे प्रमाण कमी झालेले दिसत नाही. भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर देश आर्थिकदृष्ट्या कमकुवत व मागासलेल्या स्थितीत होता. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर नियोजनाची गरज भासू लागली.

जगात अनेक शास्त्रज्ञांनी वेळोवेळी नियोजनाचे महत्त्व पटवून दिलेले आहे. भारतही यास अपवाद नाही. ऑस्कर लांगे यांच्यामते, 'विकसनशील देशाच्या विकासाचा एकमात्र उपाय आर्थिक नियोजन आहे.' या विधानावरून नियोजनाचे महत्त्व समजते. स्वातंत्र्यानंतर भारताच्या विकासासाठी पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून नियोजन करण्यात आले.

भारतात नियोजनाच्या आवश्यकतेची कारणे खालीलप्रमाणे आहेत.-

**(१) मर्यादित साधनांचा सर्वाधिक उपयोग -** भारतात विपुल प्रमाणात साधनसंपत्ती उपलब्ध होती. या साधनांचा मर्यादित उपयोग होत होता. या साधनांचा योग्य पद्धतीने विकासासाठी उपयोग करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता होती.

**(२) भांडवलनिर्मिती -** भारतात जनतेचे दरडोई उत्पन्न कमी असल्यामुळे येथील जनतेचे बचतीचे प्रमाण कमी आहे.

**भारतात नियोजनाची आवश्यकता**

(१) मर्यादित साधनांचा सर्वाधिक उपयोग
(२) भांडवल निर्मिती
(३) तांत्रिक विकास
(४) समतोल अर्थव्यवस्था
(५) मूलभूत सोयी
(६) समाजवादी समाजरचना
(७) बेकारीचा प्रश्न
(८) उत्पादन व संपत्तीची विषमता
(९) भांडवलशाही अर्थव्यवस्था
(१०) औद्योगिक विकास
(११) इतर प्रश्न

त्यामुळे इतर विकसनशील देशांपेक्षा भारतात भांडवलनिर्मितीचे प्रमाण कमी आहे. देशात बचत कमी होत असल्यामुळे भांडवलनिर्मिती दर कमी आहे. देशाच्या विकासासाठी भांडवलनिर्मितीचा दर वाढविणे व गरीबीचे दुष्टचक्र कमी करणे आवश्यक असते. या दोन्ही गोष्टी नियोजनातून साध्य करता येतात.

**(३) तांत्रिक विकास -** रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने तसेच राष्ट्रसंपन्नतेसाठी तांत्रिक विकास होणे आवश्यक असते. नियोजनातून तांत्रिक विकास साधण्यास मदत होते. तांत्रिक विकासासाठी नियोजनाची आवश्यकता असते.

**(४) समतोल अर्थव्यवस्था -** भारतात अनेक क्षेत्रात विषमता दिसून येते. अनेक क्षेत्रात साधने विपुल असूनदेखील त्यांचा योग्य प्रमाणात वापर न केल्यामुळे उपभोग व उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होते. त्यामुळे दरडोई उत्पन्नात घट दिसत असल्यामुळे या क्षेत्रात विकास करणे आवश्यक ठरते. समतोल अर्थव्यवस्थेसाठी नियोजन वरदान ठरत असते. नियोजनामुळे ही विषमता दूर करता येते.

**(५) मूलभूत सोयी -** देशाच्या सर्वांगीण विकासासाठी व आर्थिक विकासासाठी दळणवळण, सिंचन, ऊर्जा, दूरसंचार, वाहतूक अशा मूलभूत सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक असते. या सोयींशिवाय विकास होणे अशक्य असते. या मूलभूत सोयी नियोजनच्या माध्यमातून साध्य करता येतात.

**(६) समाजवादी समाजरचना -** भारताने नेहमी समाजवादी दृष्टिकोन ठेवला असून आर्थिक नियोजन हे समाजवादाचे अंग आहे. गांधीजींच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी समाजवादातून विकास साधण्याच्या दृष्टिने भारताने नियोजनाची कास धरली आहे.

**(७) बेकारीचा प्रश्न -** प्रारंभी काळापासून भारतात बेकारीचा प्रश्न भेडसावत आहे. सद्यस्थितीत बेकारीच्या प्रश्नाने उग्ररूप धारण केले आहे. रोजगारनिर्मिती व उद्योगनिर्मिती यांच्यात वाढ झाल्याशिवाय बेरोजगारी दूर होत नाही. ही बेरोजगारी दूर करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते.

**(८) उत्पादन व संपत्तीची विषमता -** भारतात संपत्ती व उत्पादनात विषमता आढळून येते. ही विषमता देशाच्या प्रगतीला घातक असते. नियोजन करून ही विषमता दूर करता येते.

**(९) भांडवलशाही अर्थव्यवस्था -** योग्य प्रमाणात विकसित झालेली भांडवलशाही अर्थव्यवस्था देशाच्या विकासासाठी तारक असते. जर भांडवलशाही अर्थव्यवस्था विकसित झाली नसेल तर यात देश आणि राज्य यांना हस्तक्षेप करणे आवश्यक असते. नियोजनामुळे या बाबी सुसह्य होतात. केन्स या शास्त्रज्ञाने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दोष दूर करण्यसाठी शासकीय हस्तक्षेप अनिवार्य मानले आहे.

**(१०) औद्योगिक विकास -** उद्योग हा देशाचा कणा आहे. देशाची अर्थव्यवस्था उद्योगावर अवलंबून असते. उद्योगामुळे देशाचे आणि देशातील लोकांचे भवितव्य ठरते. म्हणूनच 'उद्योगाचे घरी रिद्धिसिद्धि पाणी भरी' असे म्हटल्या जाते. उद्योगामुळे देश संपन्न होते आणि त्यामुळे अनेक प्रश्न सुटतात. नियोजनामुळे या सर्व गोष्टी सोप्या होतात.

**(११) इतर प्रश्न -** देशातील शैक्षणिक, आरोग्य, लोकसंख्या वाढ व अशा अनेक प्रकारच्या समस्यांच्या निवारणासाठी नियोजनाची गरज असते.

**भारतीय नियोजनाचे उद्देश -**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात देशाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजरचना, गरिबी, आर्थिक विषमता, बेरोजगारी, नैसर्गिक संसाधने या सर्व बाबी विचारात घेऊन भारतीय नियोजनाचे खालील उद्देश ठरविण्यात आले.

**(१) रोजगारात वाढ करणे -** रोजगारामुळे कुटुंबाला काम करण्याची संधी प्राप्त होते. त्यामुळे आर्थिक व्यवहार सुकर होतात. ही बाब विचारात घेऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व सवलतींमध्ये वाढ करणे, हा भारतीय नियोजनाचा प्रमुख उद्देश ठेवण्यात आला. त्यामुळे श्रमप्रधान योजनांवर अधिक भर देण्यात आला.

**भारतीय नियोजनाचे उद्देश :**
(१) रोजगारात वाढ करणे
(२) दरडोई व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे
(३) स्वयंपूर्णतः
(४) कल्याणकारी राज्याची स्थापना
(५) मागासभागाचा विकास करणे
(६) औद्योगिक विकास
(७) आर्थिक विषमता दूर करणे
(८) लोकसंख्या नियंत्रण

**(२) दरडोई व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे -** नागरिकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली तर राष्ट्रीय उत्पन्नातही वाढ होते आणि जनतेचेही जीवनमान उंचावते. ही बाब विचारात घेऊन जनतेच्या उत्पन्नात वाढ होणाऱ्या योजनांवर भर देण्यात आला.

**(३) स्वयंपूर्णतः -** प्रत्येक देशाने अन्नधान्य, संरक्षण, तांत्रिक, वैद्यकीय, दूरसंचार या क्षेत्रात स्वयंपूर्ण असणे अत्यंत आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन देशाच्या स्वयंपूर्णतेसाठी हरितक्रांती, धवलक्रांती घडविण्यात आली. पाणी, मत्स्य व्यवसाय, तेलबिया व अशा प्रकारच्या विविध बाबतीत देशाला स्वयंपूर्ण करण्यासाठी क्रांती घडवून आणण्यासाठी नियोजनावर भर देण्यात आला.

**(४) कल्याणकारी राज्याची स्थापना -** देशातील जनतेच्या किमान दैनंदिन गरजांची पूर्तता होणे आवश्यक असते. यासाठी जनतेला रोजगार, उद्योग, अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतूक, वीजनिर्मिती, गृहनिर्माण इत्यादी बाबतीत सोयी उपलब्ध करून देणे हे शासनाचे कर्तव्य असते. यामुळेच नियोजनात किमान गरजा पूर्ण करणाऱ्या योजना राबवण्यावर भर देण्यात आला. कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

**(५) मागास भागाचा विकास करणे -** भारतात अनेक राज्यांत मागासलेले भाग असून अशा भागांना विकसित भागांच्या समकक्ष ठेवणे ही शासनाची प्रथम जबाबदारी असते. सर्वांना समान संधी हे शासनाचे ध्येयधोरण असल्यामुळे मागासवर्गीय भागाचा विकास करणे नितांत आवश्यक असते. याबाबतीत प्रकर्षाने विचार होऊन मागासलेपणा दूर करण्यासाठी शासन केंद्रीय स्तरावरून राज्यांना अनेक पॅकेजेस मंजूर करीत आहे.

**(६) औद्योगिक विकास -** औद्योगिक विकासावरच राष्ट्राचा सर्वांगीण विकास अवलंबून असतो. त्यामुळे भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच औद्योगिक विकासावर विशेष लक्ष दिले. यामुळेच औद्योगिकीकरणाला भारतामध्ये नियोजनांतर्गत वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला.

**(७) आर्थिक विषमता दूर करणे -** भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक विषमता दिसून येते. ही आर्थिक विषमता दूर होणे गरजेचे असल्यामुळे नियोजनात आर्थिक विषमता दूर करण्याला प्राधान्य देण्यात आले.

**(८) लोकसंख्या नियंत्रण -** लोकसंख्या वाढ हा देशाच्या आर्थिक प्रगतीतील सर्वांत मोठा अडथळा आहे. यामुळे उपलब्ध साधने कमी पडतात आणि त्यामुळे देशाचा विकास करणे दुरापास्त होते. लोकसंख्या वाढीमुळे दारिद्र्यात वाढ होऊन विकासाचा समतोल बिघडतो. लोकसंख्या वाढीमुळे सर्वच प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रण ही नियोजनातील महत्त्वाची बाजू आहे.

**योजनाकालीन औद्योगिक विकास -** स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० पासूनच भारतात नियोजनबद्ध आर्थिक विकासाचा कार्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. त्यावेळी देशासमोर दारिद्र्य, आर्थिक विषमता, सामाजिक अस्थिरता, संयुक्त राज्यांचा प्रश्न, प्रांतरचना, आर्थिक न्याय असे अनेकविध प्रश्न होते. या प्रश्नांवर मात करण्यासाठी जनतेस सामाजिक न्याय देणे, औद्योगिक विकास करून आर्थिक विकासाची गती वाढविणे, विषमता दूर करण्यासाठी तसेच मर्यादित साधनसंपत्तीचा योग्य वापर करून देशाची प्रगती व विकासाकडे वाटचाल करण्याच्या हेतूने नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. या नियोजन मंडळाने विविध योजना तयार करून या योजनांची अंमलबजावणी केली. स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत भारत औद्योगिकदृष्ट्या मागासलेलाच होता. गरजा भागविण्यासाठी भारताला विदेशावर अवलंबून रहावे लागत असे. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सरकारच्या औद्योगिक धोरणामुळे भारतात पाहिजे तसा उद्योगाचा विकास झाला नाही. त्यामुळेच समतोल राखला गेला नाही. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र योग्य

पद्धतीने औद्योगिक विकास होण्याची गरज भासू लागली. त्यामध्ये विशाल उद्योग, कुटीर व लघुउद्योग तसेच मध्यम व इतर उद्योगांना अभय मिळणे आवश्यक होते. औद्योगिक विकासात प्रामुख्याने खालील तीन बाबींमध्ये सरकारची भूमिका आवश्यक असते.

(अ)औद्योगिक धोरण (ब)औद्योगिक क्षेत्रातील प्राधान्य क्रम (क) योजनाकालीन उत्पादन प्रगती

देशात औद्योगिक विकास घडवून आणण्यसाठी व देशाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने भारत सरकारने पंचवार्षिक योजनांद्वारे अनेक गरजांची पूर्तता केली आहे. १९५१-५२ ते आजपर्यंत अकरा पंचवार्षिक योजना आखण्यात आल्या असून याद्वारे औद्योगिक प्रगती साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### नियोजनाची आवश्यकता

आर्थिक नियोजन ही आजची गरज बनली आहे. या नियोजनात आर्थिक साधनसंपत्तीवर नियंत्रण ठेवले जाते. या नियंत्रणात राज्याचा हस्तक्षेप आणि नियंत्रण यांचे प्रमाण तसेच प्रकार वेगवेगळे असू शकते. नियोजित अर्थव्यवस्था ही अधिकृत अधिकाऱ्याकडून नियंत्रित केली जाते. बाजारातील प्रभावासमोर नियोजनास दुय्यम स्थान दिले जात नाही.

**भारतातील पंचवार्षिक योजना**

| पंचवार्षिक योजना | कालावधी | | खर्च (Outlay-er) | | वाढ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | केंद्र | राज्य | स. प्रदेश | एकूण | (Growth) |
| पहिली पंचवार्षिक | १९५१-५६ | १२४१.०० | ८२८.०० | - | २०६९.०० | ३.६ |
| द्वितीय पंचवार्षिक | १९५६-६१ | २५५९.१२ | २२४०.८८ | -- | ४८००.०० | ४.३ |
| तृतीय पंचवार्षिक | ९९६१-६६ | ३६००.०० | ३७२५.०० | १७५.०० | ७५००.०० | २.८ |
| चतुर्थ पंचवार्षिक | १९६९-७४ | ८८७०.०० | ६६०६.४७ | ४२५.०० | १५९०२.१६ | ३.३ |
| पाचवी पंचवार्षिक | १९७४-७९ | १९९५४.१० | १८२६५.०८ | ६३४.०६ | ३८८५३.२४ | ४.८ |
| सहावी पंचवार्षिक | १९८०-८५ | ४७२५०.०० | ४८६००.०० | १६५०.०० | ९७५००.०० | ६.० |
| सातवी पंचवार्षिक | १९८५-९० | ९५५३४.०० | ८०६९८.०० | ३७६८.०० | १८००००.०० | ६.० |
| आठवी पंचवार्षिक | १९९२-९७ | २४७८६५.०० | १७९९८५.०० | ६२५०.०० | ४३४१००.०० | ६.८ |
| नववी पंचवार्षिक | १९९७-०२ | ४८९३६१.०० | ३६९८३९.०० | -- | ८५९२००.०० | ५.५ |
| दहावी पंचवार्षिक | २००२-०७ | ८९३१८३.०० | ६३२४५६.०० | -- | १५२५६३९.०० | ७.२ |
| अकरावी पंचवार्षिक | २००७-१२ | २१५६६७१.०० | १४८८१४७.०० | -- | ३६४४७१८.०० | |

स्रोतः नियोजन आयोग

### (१) पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-५२ ते १९५५-५६)

१९५१-५२ पासून भारतात पंचवार्षिक योजनेची सुरुवात करण्यात आली. यात नियोजनविषयक दृष्टिकोन ठरवून नियोजित अर्थव्यवस्थेचा पाया घालण्याचे कार्य करण्यात आले.

**योजनेचा विस्तार** - पहिली पंचवार्षिक योजना ही सार्वजनिक क्षेत्रासाठी ठरविण्यात आली. यात एकूण २०६९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. पुढे ही रक्कम वाढवून २३५६ कोटी रुपये एवढी करण्यात आली. परंतु, प्रत्यक्षात मात्र १९६० कोटी रुपयेच खर्च झाले. या योजनेतंर्गत शेती क्षेत्रास देखील प्राधान्य देण्यात आले. शेतीबरोबरच सामूहिक योजना, जलसिंचन, वाहतूक व संचार, उद्योग व सामाजिक सुधारणा या बाबींना प्राधान्य देण्यात आले.

**(अ) शेती** - भारत हा कृषीप्रधान देश असून देशाची अर्थव्यवस्था ही शेतीवरच अवलंबून आहे. यामुळेच औद्योगिक क्षेत्रासाठी लागणार कच्च्या मालादेखील शेतीतूनच प्राप्त होतो. त्यामुळेच शेतीच्या विकासाबरोबरच औद्योगिक विकास करण्यासाठी प्राधान्य देण्यात आले. भारताची फाळणी झाल्यामुळे ताग, तांदूळ, गहू या उत्पादनाचा प्रदेश पाकिस्तानात समाविष्ट झाला आणि

त्यामुळे अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यासाठी नियोजनात शेती लक्ष्य करण्यात आली. शेती हा उद्योग असल्यामुळे या क्षेत्रातून उद्योगधंदे वाढणार असल्याने रोजगार आणि अन्नधान्यास वाढती मागणी या बाबींचा विचार करण्यात आला. जमीनविषयक धोरण ठरवून जमीन मालकीच्या कमाल क्षेत्रास व सहकारी शेतीस प्रोत्साहन देण्यात आले. शेती क्षेत्रावर एकूण खर्चाच्या ४४ टक्के म्हणजे ८६१ कोटी रुपये खर्च करण्यात आले.

**(ब) जलसिंचन -** या योजनेत औद्योगिक विकास साधण्याच्या दृष्टीने वीजनिर्मिती व जलसिंचनावर ४० कोटी रुपये खर्च करण्यात आले. या योजनेत दामोदर, हिराकुंड, भाक्रानांगल याद्वारे शेतीस पाणीपुरवठा आणि वीजनिर्मिती करण्यात आली. याचबरोबर चंबळ, कोयना, रिहाद आणि कोशी या योजना मंजूर करण्यात आल्या.

**(क) वाहतूक व संचार -** औद्योगिक विकासात वाहतूक व संचारव्यवस्था यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या योजनेतंर्गत रेल्वे, जहाजबांधणी व बंदर, विमान वाहतूक, टपाल, नभोवाणी इत्यादींवर ५३८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. या योजनेतंर्गत चित्तरंजन येथे रेल्वे इंजिन तयार करण्याचा कारखाना उभारण्यात आला. जहाजबांधणी व बंदर विकासाच्या दृष्टीने कांडला येथे नवीन बंदर बांधण्यात आले आणि कलकत्ता, मुंबई, मद्रास, विशाखापट्टणम, कोचीन या बंदरांचा विकास करण्यात आला. विमान वाहतुकीसाठी १९५३ मध्ये वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. एअर इंडिया इंटरनॅशनल व इंडियन एअर लाईन्स कॉर्पोरेशन स्थापन करण्यात आले. दळणवळणच्या सोयीच्या दृष्टीने तारायंत्र, दूरध्वनी, टपाल व नभोवाणी यांच्यावर खर्च करण्यात आला. या सगळ्यांचा विकास औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे.

**(ड) उद्योग -** पहिल्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत उदयोगाच्या विकासाची जबाबदारी खाजगी क्षेत्रावर टाकण्यात आली व त्यावर सरकारकडून नियंत्रण ठेवण्यात आले. २९२ कोटी एकूण गुंतवणुकीपैकी २३३ कोटी रुपये खाजगी क्षेत्राकडून उद्योगांच्या विकासासाठी गुंतवण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रात मूलभूत उद्योगधंद्यांच्या स्थापनेला प्राधान्य देण्यात आले. संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असलेले उद्योग व रेल्वे सरकारी क्षेत्रात आणण्यात आले. लोहपोलाद, कोळसा, खनिज तेल, विमान व जहाजबांधणी, टेलिफोन, वायरलेस इत्यादींची जबाबदारी सरकारकडे ठेवण्यात आले.

या पंचवार्षिक योजनेत लघु व कुटीर उद्योगांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले. हे उद्योग एकमेकांना पूरक व्हावेत म्हणून समान कार्यक्रम आखण्यात आला. यामध्ये साबण, तेल, गूळ, खांडसारी साखर, तांदूळ, कातडी, लोकर, कागद, मधमाशापालन व आगपेटी इत्यादी ग्रामोद्योगाकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. या उद्योगांना भांडवल व तांत्रिक सहकार्य देऊन सुधारणेसाठी संशोधनावर भर देण्यात आला..

लघु उद्योगांसंबंधी धोरणात ग्रामीण कारागीरांना रोजगार मिळावा हा या योजनेचा उद्देश होता. लहान उद्योगांना मोठ्या उद्योगांशी चढाओढ करावी लागू नये म्हणून मोठ्या उद्योगांच्या उत्पादनावर मर्यादा घालावी, लघु उद्योगांना राखीव क्षेत्र द्यावे, मोठ्या उद्योगांवर उपकर बसवावा, असे या योजनेत ठरले होते. वर्तमानकालीन उत्पादन क्षमतेचा अधिकाधिक उपयोग करणे, लोहपोलाद, सिमेंट, रसायने,यंत्रसामुग्री, खते, ॲल्युमिनिअम या मूलभूत व उत्पादक उद्योगांच्या उत्पादनक्षमतेत वाढ करणे, औद्योगिक विकासात सहाय्यभूत ठरणारे आणि औद्योगिक विषमता दूर करणाऱ्या उद्योगांची स्थापना करण्यात आला.

**(इ) योजनेचे यशापयश -** या पंचवार्षिक योजनेच्या काळात औद्योगिक उत्पादनात ४० टक्क्याने वाढ झाली. गिरणी कापडाचे उत्पादन, सिमेंट, साखर, कागद व पुठ्ठा इत्यादीच्या उत्पादनात वाढ झाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेत उद्योगक्षेत्रात उत्पादनाची पातळी वाढल्यामुळे समाधानकारक प्रगती झाली.

**(२) द्वितीय पंचवार्षिक योजना (१९५६-५७ ते १९६०-६१)**

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या यशस्वी समाप्तीनंतर १ एप्रिल १९५६ पासून दुसरी पंचवार्षिक योजना सुरू झाली. या योजनेत मूलभूत उद्योगावर भर देण्यात आला. १९५७ मध्ये नवीन औद्योगिक धोरणाच्या घोषणेनंतर सार्वजनिक क्षेत्र वाढविण्यात आले. या योजनेतंर्गत सार्वजनिक क्षेत्रात अवजड व मूलभूत उद्योगांचा विकास करण्यात आला. सार्वजनिक क्षेत्रात राऊरकेला (ओरिसा), दुर्गापूर (पं. बंगाल), भिलाई (मध्य प्रदेश)या तीन ठिकाणी नवीन पोलाद उद्योग स्थापन करण्यात आले. टाटा आयर्न वर्क्स आणि म्हैसूर आयर्न स्टील वर्क्स या कारखान्यांचा विकास करण्यात आला. या योजनेत सार्वजनिक क्षेत्रातर्फे ४८०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार होते. परंतु या योजनेवर प्रत्यक्षात ४६०० कोटी रुपये खर्च झाले. या योजनेत ग्रामोद्योग व लघु

उद्योगासाठी १७५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. दुसऱ्या योजनेत औद्योगिक विकासासाठी चौपट खर्च करण्यात आला. औद्योगिक उत्पादनात ५५ टक्क्यांनी वाढ झाली. या योजनेत लोहपोलाद, नायट्रोजनयुक्त खते, रसायने, अवजड यंत्रसामग्री, यंत्रे तयार करणाऱ्या कारखान्यावर भर देण्यात आला. या योजनेची विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे या योजनेत यंत्रोत्पादक उद्योगाची प्रगती मोठ्या प्रमाणावर झाली. शेती, वाहतूक, रसायने, कापड, ताग, सिमेंट, चहा, साखर, कागद इत्यादी उद्योगासाठी लागणारी यंत्रे भारतातच तयार केली जाऊ लागली.

या योजनेतंर्गत एकूण खर्चापैकी १८७ कोटी रुपये कुटीर व लघु उद्योगांसाठी आणि ९३८ कोटी रुपये संघटित उद्योगांसाठी खर्च करण्यात आले. या काळात ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनात चांगली वाढ झाली. या योजनेत औद्योगिक क्षेत्रासाठी एकूण १८१० कोटी रुपये गुंतवणुकीची तरतूद करण्यात आली होती. संघटित क्षेत्रासाठी ८७० कोटी रुपये, खाजगी क्षेत्रासाठी ६७५ कोटी रुपये आणि ग्रामीण व लघु उद्योगासाठी २६५ कोटी रुपये गुंतवणूक करण्यात आली. देशामध्ये साठ औद्योगिक वसाहती निर्माण करून १०० छोटे कारखाने स्थापन करण्यात आले. अशा प्रकारे द्वितीय पंचवार्षिक योजनेत एका अर्थाने देशाच्या भविष्यातील औद्योगिक विकासासाठी आवश्यक प्रारंभिक आधार निर्माण करण्यात आला.

### (३) तृतीय पंचवार्षिक योजना (१९६१-६२ ते १९६५-६६)

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत सार्वजनिक क्षेत्रात ७५०० कोटी रुपये व खाजगी क्षेत्रात ४१०० कोटी रुपयांचे नियोजन करण्यात आले. यामध्ये कुटीर व लघु उद्योगावर २४१ व संघटित उद्योग व खाणी यावर १७२६ रुपये खर्च करण्यात आले. या योजनेतंर्गत पुढील पंधरा वर्षांचा विचार करून वेगाने औद्योगिकीकरण करण्यासाठी उद्योगक्षेत्राची आवश्यक पायाभरणी करणे असे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने प्रमुख उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्या अनुषंगाने भांडवली आणि उत्पादक वस्तू उद्योग स्थापना करणे, यामध्ये प्रामुख्याने यंत्रनिर्मिती उद्योगावर भर देणे तसेच शक्तिसाधने आणि वाहतूक साधनांचा विकास करणे, औद्योगिक विकासासाठी पूरक कौशल्ये, तांत्रिकज्ञान, अभिकल्पित क्षमता संपादनावर भर देण्यात आला आहे. औद्योगिक विकासासाठी पुढीलप्रमाणे प्राधान्य देण्यात आले.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत हाती घेतलेले आणि अपूर्ण राहिलेले प्रकल्प पूर्ण करण्याचे काम या पंचवार्षिक योजनेत करण्यात आले. यंत्रबांधणी उद्योग, कास्टिंग आणि फेरो अलाईज या उद्योगातील क्षमतेचा विस्तार करणे, खत, पेट्रोलियम वस्तूंचे उत्पादन वाढविणे, अवजड यंत्र वस्तू उद्योग यांच्यावर भर देण्यात आला. आवश्यक औषधे, कापड, साखर, वनस्पती तेल, कागद, घरबांधणीसाठी लागणारी साधने इ. वस्तूंचे उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात आला.

या योजनेत औद्योगिक विकासाकरिता ३००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यापैकी सार्वजनिक क्षेत्रासाठी १७०० कोटी व खाजगी क्षेत्रासाठी १३०० कोटी रुपये निर्धारित करण्यात आले. या योजनेत सार्वजनिक क्षेत्राला विशेषत: उत्पादक वस्तू उद्योगावर भर देऊन आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका प्रदान करण्यात आली. खाजगी क्षेत्रात उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनावर अधिक भर देण्यात आला. या योजनेत उद्योगाची प्रगती समाधानकारक झाली. ७१ टक्क्यांनी विद्युत यंत्रांचे आणि ८२ टक्क्यांनी इतर यंत्रांचे उत्पादन वाढले. रासायनिक वस्तू, पेट्रोलियम, साखर, सुती उद्योगांसाठी लागणारी यंत्रे, डिझेल यंत्रे, पेट्रोलियम वस्तू, रसायने व सिमेंट उद्योगांमध्ये देखील उत्पादनात वाढ झाली. या योजनेत हेवी इंजिनिअरिंग कार्पोरेशन, भारत हेवी इलेक्ट्रिक्स लि. आणि मायनिंग अलाईड मशीनरी या तीन उपक्रमांची स्थापना करण्यात आली.

### (४) त्रैवार्षिक योजना (१९६६-६७ ते १९६८-६९)

भारत सरकारने पुढील पंचावार्षिक योजना ठरविण्यापेक्षा या कालावधीत त्रैवार्षिक योजना राबवली. या योजना काळात औद्योगिक विकासासाठी पुरेशी गुंतवणूक न केल्यामुळे औद्योगिक विकासाचा वेग प्रतिवार्षिक केवळ २ टक्के राहिला. या काळात हरितक्रांतीद्वारे कृषी उत्पादनात वाढ करण्याच्या उद्देशाने शेती तंत्रज्ञानाचा वापर व खतांचा वापर करण्याचे प्रयत्न करण्यात आले. यामुळे शेतीला साधने पुरविणारे उद्योग आणि शेतीवर आधारित उद्योगांच्या विकासासाठी अनुकूल स्थिती निर्माण झाली.

या योजना काळात १९६६-६७, १९६७-६८, १९६८-६९ अशा तीन भागात त्रैवार्षिक योजना आखण्यात आल्या. यातील १९६६-६७ या वर्षांत उद्योग व खाणी यावर ५२४.७७ कोटी आणि परिवहन व संचार यावर ४२८.४३ खर्च करण्यात आले. यामुळे औद्योगिक उत्पादनात ३ टक्के वाढ झाली. त्यानंतर १९६७-६८ मध्ये ग्रामीण विद्युतीकरण, शेती उत्पादन,

खतनिर्मिती, कीटकनाशके, औषधीनिर्मिती, शेतीसाठी उपयुक्त यंत्रनिर्मिती या उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले. तसेच.उद्योग व खाण उद्योगावर ५२१ कोटी रुपये खर्च करण्यात आले. याकाळात उत्पादन वाढीचा दर २ टक्के एवढा राहिला. १९६८-६९ मध्ये उद्योगावर ५३९.३३ कोटी रुपये खर्च करण्यात आले. यावेळी औद्योगिक उत्पादनावर ६.२ टक्क्यांनी वाढले.

**(५) चौथी पंचवार्षिक योजना (१९६९-७० ते १९७३-७४)**

देशाची चौथी पंचवार्षिक योजना १९६९-७० ते १९७३-७४ या कालावधीत राबविण्यात आली. या योजनेमध्ये संघटित उद्योग आणि खाण क्षेत्रासाठी एकूण ५३३८ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. यात सार्वजनिक क्षेत्रासाठी ३३३८ कोटी रुपये आणि खाजगी क्षेत्रासाठी २००० कोटी रुपये गुंतवणूक करण्यात आली. या योजना काळात औद्योगिक विकासाचे कार्यक्रम आणि धोरण राबविताना औद्योगिक संरचनेतील असमतोल दूर करणे आणि उद्योग क्षेत्रामधील क्षमतेचा पूरेपूर उपयोग करणे, यावर विशेष भर देण्यात आला.

अस्तित्वात असलेल्या उत्पादन क्षमतेच्या पातळीत वर्तमान काळातील आणि भविष्य काळातील विकास साधता येईल, अशी वाढ करणे, नवीन उद्योगाची उभारणी करण्यासाठी किंवा उद्योगासाठी नवीन घटक आधार निर्माण करण्यासाठी देशांतर्गत झालेल्या विकासाचा व उपलब्ध साधनांचा जास्तीत जास्त लाभ घेणे, या बाबींवर भर देण्यात आला.

या योजने अंतर्गत उत्पादनवाढीचा दर मंद राहिला. कारण औद्योगिक क्षेत्रात अपुरी गुंतवणूक झाली. त्यामुळे औद्योगिक यंत्राच्या मागणीत घट झाली व याचा भांडवली वस्तू उद्योगाच्या उत्पादनावर विपरित परिणाम झाला. मूलभूत कच्च्या मालाची टंचाई झाल्यामुळे पोलाद उत्पादन आणि अलोह धातूचे उत्पादन यामध्ये पीछेहाट झाली व याचा विपरित परिणाम अभियांत्रिकी उत्पादनवाढीवर झाला. पोलाद, खते या क्षेत्रातील उद्योगांमध्ये कामगारांच्या संपामुळे औद्योगिक कलह निर्माण झाला. वाहतुकीच्या साधनांच्या प्रश्नामुळे उत्पादनावर विपरित परिणाम झाला. सिमेंट, पोलाद, सूती कापड, खते व इतर अनेक उद्योगांना विद्युत न मिळाल्यामुळे उत्पादनात घट झाली. या सर्व कारणांमुळे उत्पादनवाढीचा वेग मंदावला.

**(६) पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४-७५ ते १९७८-७९)**

या योजनेत औद्योगिक व खाण विकास कार्यक्रमात स्वयंपूर्णता मिळविणे व विकास साधणे, हा महत्त्वाचा हेतू होता. त्याचप्रमाणे प्राधान्यक्रम दिलेल्या क्षेत्रात गुंतवणुकीच प्रमाण वाढवावे व उत्पादनतंत्राचा विकास करणे, मूलभूत औद्योगिक क्षेत्राचा जलदगतीने विकास करणे, निर्यातीपासून उत्पन्न वाढविणे, उपभोग्य वस्तूंचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा करणे, अनावश्यक वस्तूंच्या उत्पादनावर निर्बंध घालणे, ग्रामीण व लघु उद्योगांना प्रोत्साहन देणे व औद्योगिकदृष्ट्या मागासभागांना प्राधान्य देणे यांवर विशेष भर देण्यात आला. सुधारित अंदाजानुसार उद्योग व खनिज क्षेत्रासाठी सार्वजनिक क्षेत्रातून १०२०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची तरतूद करण्यात आली. यातील ५३५ कोटी रुपये ग्रामीण व लघु उद्योगांसाठी राखून ठेवण्यात आले. औद्योगिक उत्पादनात वाढ होण्यासाठी शेवटच्या तीन वर्षांत विशेष सवलत देण्यात आली.यात आवश्यक औषधे, सुतगिरण्या, उद्योगांना लागणारी यंत्र निर्माण करणारे असे २१ उद्योग परवाना धोरणापासून वगळण्यात आले. देशी व विदेशी अशा २९ कंपन्यांना त्यांच्या स्थापित क्षमतेनुसार पूरेपूर उपयोग करण्यासाठी परवानगी देण्यात आली. अभियांत्रिकी वस्तूंच्या निर्यातवाढीची क्षमता वाढविण्यात आली. त्याचप्रमाणे अनिवासी भारतीयांना भारतात औद्योगिक प्रकल्प स्थापन करण्यासाठी व त्यांचे उत्पन्न काही निवडक उद्योगांमध्ये गुंतविण्यासाठी विविध सवलती देण्यात आल्या. यामुळे शेवटच्या तीन वर्षांत औद्योगिक उत्पादनवाढीत प्रगती झाली.

**(७) सहावी पंचवार्षिक योजना (१९७९-८० ते १९८३-८४)**

या योजनेअंतर्गत उद्योगांच्या स्थापित उत्पादन क्षमतेचा पर्याप्त उपयोग करणे, उत्पादकता वाढविणे, उपभोग्य वस्तू व उपभोग्य टिकाऊ वस्तू तसेच कृषी आणि उद्योगाच्या विकासासाठी सायक अंशत: प्रक्रियेत व भांडवली वस्तू इ.वस्तूंचा पुरेसा पुरवठा करण्यासाठी या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील प्रकल्पांच्या क्षमतेत वाढ करण्यासाठी वस्तूंची निर्मिती करण्याचे ठरविण्यात आले. इलेक्ट्रॉनिक उद्योग, अभियांत्रिकी वस्तू यांच्या उत्पादनवाढीसाठी व औद्योगिक विकासासाठी उत्कृष्ट तंत्रज्ञान व संशोधन अशा औद्योगिक विकासाच्या उपक्रमांवर भर देण्यात आला. या पंचवार्षिक योजनते उद्योग आणि खनिज क्षेत्रातून कोळसा व पेट्रोलियम हे दोन प्रकल्प वगळण्यात आले. त्याऐवजी ऊर्जाशक्ती या क्षेत्राचा या योजनेत समावेश

करण्यात आला. औद्योगिक उत्पादन वाढीचा दर प्रतिवर्षी ८ टक्के गृहीत धरण्यात आला असताना, हा दर ५.५ टक्क्यांनी वाढलेला आढळून आला. या योजनते अपेक्षित औद्योगिक क्षेत्राची वाढ झाली नाही. मोटरसायकल, स्कूटर्स, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, यंत्रे, अवजारे व दळणवळणाची साधने यामध्ये विकास झाला.

**(८) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-८६ ते १९८९-९०)**

या योजने अंतर्गत उद्योग व खाण क्षेत्रातील विकासाच्या कार्यक्रमासाठी सार्वजनिक क्षेत्रातून १९७०८ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. त्यापैकी १७२६४ कोटी रुपये केंद्रीय प्रकल्पासाठी आणि २४४४ कोटी रुपये राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी गुंतविण्याचे निश्चित करण्यात आले. याशिवाय ग्रामीण आणि लघु उद्योगाच्या विकासासाठी २७५२ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले. या योजनेत १२.५ टक्के औद्योगिक विकासासाठी राखून ठेवण्यात आले. यामध्ये उद्योगाची पुनर्रचना, भांडवलाचा कार्यक्षमतेने उपयोग, मूलभूत सोयीत वाढ, तंत्रज्ञानाचे आधुनिकीकरण,सुधारणा, उत्पादकता, निर्यातविषयक दृष्टिकोन या बाबींवर भर देण्यात आला. भारतीय उद्योगापुढे असणारे विविध अडथळे दूर करण्यासाठी व औद्योगिक क्षेत्राच्या आधुनिकीकरणाच्या मार्गाने वाटचालीसाठी खाजगी, सार्वजनिक क्षेत्र, कामगार व व्यवस्थापन यांच्या संयुक्त प्रयत्नासाठी अनुकूल चौकट निर्माण करण्याचा प्रयत्न या योजनेत करण्यात आला. या योजनेत कृषी क्षेत्राशी औद्योगिक विकासाची सांगड घालण्यात आली व त्यामुळे औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला दिशा प्राप्त होऊन वेग आला.

**(९) आठवी पंचवार्षिक योजना (१९९२-९३ ते १९९७-९८)**

औद्योगिक विकासाच्या दृष्टिने आठव्या पंचवार्षिक योजनेला बदल पचवणारी योजना असे म्हटल्या जाते. या योजनेत ऊर्जा, वाहतूक, दळणवळण, सिंचन अशा क्षेत्रात गुंतवणूक करून आर्थिक विकास घडवून आणण्यास मदत करणे, प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी अविकसित प्रदेशात साधनसामुग्री पुरविणे, उत्पादकतेत वाढ करून राष्ट्रीय उत्पन्नाच्या वेगात वाढ घडवून आणणे, आंतराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धात्मक शक्ती वाढविण्यासाठी भारतातील उद्योगांचे आधुनिकीकरण करणे अशा मुद्द्यांवर भर देण्यात आला.

**(१०) नववी पंचवार्षिक योजना (१९९७ ते २००२)**

ऊर्जा क्षेत्र, शेती व सिंचन व सामाजिक सेवा यांवर या योजनेत जास्त भर देण्यात आला. राष्ट्रीय उत्पन्नाचा दर प्रतिवर्षी ६.५ टक्के असा ठरविण्यात आला असताना प्रत्यक्षात मात्र ५.३६ टक्केच वाढ झाली. १९९६ नंतर भारतीय अर्थव्यवस्था मंदीच्या भोवऱ्यात सापडली व वाढीच्या दरात मोठे चढउतार आले. औद्योगिक क्षेत्रात वाढ झाल्यामुळे शेतीवरील भार कमी होऊन विकासासाठी देशात साधनसामुग्री उपलब्ध झाली.

**(११) दहावी पंचवार्षिक योजना (२००२ ते २००७)**

नियोजन आयोगाच्या बैठकीत ५ ऑक्टोबर २००२ रोजी या योजनेच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली. या योजनेअंतर्गत अर्थव्यवस्थेचा वार्षिक वृद्धीदर ५.५ टक्क्यांवरून ८ टक्क्यांपर्यंत वाढविणे, भांडवल संपत्तीत वाढ करणे, कामगारांचे कौशल्य व ज्ञान वाढविणे व दरवर्षी एक कोटी नवीन रोजगार निर्माण करणे यावर भर देण्यात आला. परकीय गुंतवणुकीतून दरवर्षी ७५० कोटी डॉलर्स उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या योजनेत प्रयत्न करण्यात आले. देशांतर्गत साधनसामुग्रीला जोड देण्यासाठी परकीय गुंतवणुकीचा वापर व राष्ट्रहीत, देशी उद्योगांना नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यात आली.

**(१२) अकरावी पंचवार्षिक योजना (२००७ ते २०१२)**

अकराव्या पंचवार्षिक योजनेचा कार्यकाळ २०१२ मध्ये संपणार आहे. या पंचवार्षिक योजनेत औद्योगिक क्षेत्रावर भर देण्यात आला असून इलेक्ट्रॉनिक क्षेत्राला प्राधान्य देण्यात आले. या योजनेत विद्युत निर्मितीवर भर देऊन विविध राज्यांमध्ये प्रकल्प उभारले जात आहेत. दूरध्वनी उद्योगांना महत्त्व देऊन २०१२ पर्यंत भारतातील सर्व खेडी दूरध्वनीने जोडण्यात येणार आहे. उद्योगांमध्ये वाढ करून ७० दशलक्ष बेरोजगारांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्याचे लक्ष्य या योजनेचे आहे.

★ **पंचवार्षिक योजनेतंर्गत औद्योगिक विकासाचा आढावा**

पंचवार्षिक योजनेतंर्गत उद्योगांचा विकास झाला असून नवीन उद्योग उभारणीला प्रोत्साहन मिळाले आहे. त्यामुळे

औद्योगिक विकास ही एक जमेची बाजू ठरली आहे. याविषयीचा संक्षिप्त आढावा खालीलप्रमाणे -

(१) उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर दीर्घ व मध्यमकालीन कर्ज पुरवठा करण्याच्या हेतूने केंद्र व राज्य पातळीवर अनेक वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था स्थापन करण्यात आल्या.

(२) योजना काळात विदेशी सहकार उद्योगांची संख्या सातत्याने वाढत गेली.

(३) तांत्रिक व व्यवस्थापकीय शिक्षणाचा प्रसार जलदगतीने झाला.

(४) देशाच्या मजबूत व आधुनिक आर्थिक विकासासाठी आधारभूत संरचना स्थापन करण्यात आली.

(५) मूलभूत उद्योगांचा विकास लक्षणीय प्रमाणात झाला. उद्योगधंद्यांच्या संरचनेत विविधता आणण्यात आली व अनेक प्रकारचे उद्योग स्थापन करण्यात आले.

(६) उद्योगांच्या विकासात विकेंद्रीकरणाचे तत्त्वाचा अवलंब करत नवीन उद्योगांची स्थापना मागास भागात करण्यात आली.

(७) आयातपर्यायी उद्योगांचा विकास केला जाऊन देश स्वयंपूर्णतेकडे नेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

(८) जागतिक पातळीवर पुढे येण्यासाठी देशी उद्योगांचा विकास होणे आवश्यक असल्याची जाणीव नियोजनकारांना झाली. शेती उत्पादनात वाढ झाल्याशिवाय उद्योगांच्या वाढीस आवश्यक ती साधनसामुग्री व कच्चा माल मिळणार नाही, यासाठी शेती विकासावर भर देण्यात आला. उद्योगामार्फत विकासाची गती वाढविणे, लहान उद्योगामार्फत रोजगारीचे प्रमाण वाढविणे, उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढविणे असे भारताच्या औद्योगिक विकास कार्यक्रमाचे तिहेरी उद्दिष्ट ठेवण्यात आले.

(९) पोलाद कारखाने, हेवी इलेक्ट्रिकल्स, हेवी मशीन टूल्स, सिमेंट, कागद, कारखान्यांची यंत्रे तयार करणारे कारखाने, नायट्रोजन खते, कॉस्टिक सोडा, सोडाअॅश, युरिया, अमोनियम सल्फेट, पेनिसिलीन, सिंथेटिक फायबर, औद्योगिक स्फोटके, पॉलिथिलीन, वृत्तपत्रीय कागद, सायकली, शिवणयंत्रे, टेलिफोन, वीजसाहित्य, कापड व साखर कारखान्यांची यंत्रे तयार करणारे कारखाने, जहाजबांधणी, विमानबांधणी व तेलसंशोधन अशा मोठ्या उद्योगक्षेत्रात भारताने प्रवेश केला व उत्पादन क्षमता वाढविली. भारताच्या औद्योगिक विकासाची ही जमेची बाजू असून तेल संशोधनाचा कार्यक्रम यामध्ये महत्त्वाचा ठरला.

(१०) स्वातंत्र्यानंतरच भारताचे औद्योगिक विकासाच्या दृष्टीने प्रगती साधली. व्यापारी बँकांनी औद्योगिक क्षेत्रास कर्ज पुरवठा करून हातभार लावला. औद्योगिक विकासासाठी आयडीबीआय, आयसीआयसीआय, आयएफसी, युटीआय यांसारख्या राष्ट्रीय पातळीवर कर्ज देणाऱ्या संस्था स्थापन झाल्या.

(११) लघु उद्योगक्षेत्रात सुद्धा भारताने प्रगती केली. चपला, बांगड्या, कुलपे, मेणबत्ती, शर्टची बटणे, कात्र्या, मातीची भांडी, यंत्राचे सुटे भाग अशा साध्या वस्तूंची निर्यात करून परकीय चलन मिळविले. रसायने, खेळाचे साहित्य, कागद व स्टेशनरी, ऑटोमोबाईल्स, डेअरी साहित्य अशा शेकडो वस्तूंचे उत्पादन भारतात होऊ लागले. त्यामुळे औद्योगिक वसाहती स्थापन होऊ लागल्या.

(१२) औषधनिर्मिती क्षेत्रात उद्योगांनी प्रगती केली. पेनिसिलीन, स्टेप्टोमायसोन, टेट्रॅसिलिन, अॅन्टीबायोटिक पोलिओ यांसारख्या रोगावरील लसीसुद्धा तयार करण्यात आल्या.

(१३) दूरसंचार, दूरदर्शन या क्षेत्रातील उद्योगातही भारताने अमूलाग्र प्रगती केली. संगणक उद्योगात भारत अग्रणी आहे.

(१४) औद्योगिक क्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी आवश्यक असणारे तंत्रज्ञ व शास्त्रज्ञ यांना भारतातच अत्याधुनिक शिक्षण मिळत असून त्यांना भारतातील उद्योगात बऱ्याच संधी उपलब्ध आहे.

भारताची औद्योगिक प्रगती मोठ्या प्रमाणावर झाली असली तरी लघु व कुटीर उद्योगांमध्ये अनेक अडचणी निर्माण झाल्या असल्याने हे उद्योग मोडकळीस आलेले दिसून येतात. काही काळ सुती कापड उद्योगालाही उतरती कळा लागली होती. असे असले तरी, पंचवार्षिक योजनेतर्गत विकासच झाल्याचे दिसून येते.